# प्रकरण चार

## सामान्य प्रशासन विभाग

**4.1 जनसुविधा अंतर्गत ग्रामपंचार्तीना दिलेल्या अनुदानाबाबत.**

**पंचायत समिती अंबरनाथ, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती, अंबरनाथ सन 2016-2017 या वित्तीय वर्षात जनसुविधा योजने अंतर्गत ग्रामपंचायतीना अनुदान वाटप करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा वार्षिक योजनांतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान या योजनेखाली रक्कम रुपये 78,00,000/- अनुदान प्राप्त झाले आले असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे आदेश क्रमांक ठाजिप/ग्रा.पं./योजना-1/जसु/प्रमा/वशी/464, दिनांक 26/10/2016 अन्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन 2016-2017 या वित्तीय वर्षाकरीता अंबरनाथ गटातील 10 कामासाठी ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान रक्कम रुपये 78,00,000/- मंजूर केलेला निधी पंचायत समिती, अंबरनाथ यांनी ग्रामपंचायती अंतर्गत महसुली गांवाना मंजूर केलेला आहे. तरी वरील अनुदानातून रक्कम रुपये 24,00,000/- एवढया मोठया प्रमाणात निधी पंचायत समिती स्तरावर विना वापर गुंतून पडला आहे. सदर निधी विहीत वेळेत वितरण न करणेबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करणे आवश्यक आहे.

2) पंचायत समिती स्तरावरुन वितरीत केलेला निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर केला आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च केला किंवा कसे हे पाहण्याचे व सनियंत्रण करण्याचे कामकाज पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत विभागाचे आहे.

3) ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केलेल्या निधीच्या खर्चाची प्रमाणके, उपप्रमाणके ग्रामपंचायत स्तरावर असल्याने खर्चाची सत्यता पडताळता आली नाही. वितरीत केलेला निधी ज्या कामासाठी वाटप केले होते, ती कामे पुर्ण झाली किंवा कसे, यांची पडताळणी करण्यासाठी अनुदान खर्च इतके मुल्यांकन व विनियोग प्रमाणपत्रे पंचायती समिती स्तरावर उपलब्ध करुन दिली नसल्याने अनुदानाचा विनियोग झाला किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

4) वितरीत निधी त्याच प्रयोजनावर खर्च केले असल्याची खात्री पटविण्यासाठी अनुदान विनियोग दाखले, अनुदान खर्चाची मुल्यांकने, काम पूर्णत्वाचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र, इतर अभिलेखे सादर करुन अनुदान विनियोग केल्याचे खात्री पटविणे आवश्यक आहे.

तसेच वितरीत केलेला निधी ग्रामपंचायत स्तरावर पडून आहे किंवा कसे, याची खातरजमा पंचायत समिती स्तरावरुन केल्याचे दिसून येत नाही.

**4.2 साहित्य खरेदीसाठी रक्कम लाभार्थ्यांना अदा केलेबाबत.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** सामान्य प्रशासन या विभागातील 3 टक्के अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात घरघंटी, ड्रेरॉक्स, डिपफ्रिजर खरेदीची रक्कम रूपये 2,70,000/- वर्ग करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याबाबत योग्य तो खुलासा करावा व पुर्तता अनुपालन सादर करावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/08/2008 नुसार जिल्हा परीषद स्तरावर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत पुर्ण करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आलेले नाही. सदर रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात दिनांक 31/03/2017 रोजी वर्ग करण्यात आलेली आहे. सदर योजना 31 जानेवारी पर्यंत पुर्ण करणे आवश्यक होतें. परंतु, तसे करण्यात आलेले नाही. त्याबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग2015/प्र.क्र.137/वित्त-3, दिनांक 24/11/2015 या शासन निर्णयानुसार जिल्हा परीषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून 3 टक्के अपंग कल्याणकारी योजना कोणत्या बाबीवर खर्च करावी, याबाबत प्रस्तावित केलेले आहे. परंतु, सदर बाबीमध्ये डिपफ्रिजर खरेदी करण्याची तरतुदी देण्यात आलेली नाही. तरी लाभार्थ्यांनी सदरबाबत का खरेदी करण्यात आली, याबाबत खुलासा करावा. श्री.बबन धोंडु भुवड, श्री सुभाष महादेव मांडवकर, श्री गणपत गोपाळ गावणकर, श्री.भालचंद्र भरत कांबळे, श्री.सखाराम भिवाजी पाते, श्री.सुरेश पुनाजी पालशेतकर या लाभार्थ्यांनी डिपफ्रिजर खरेदी केलेले आहे. सदर लाभार्थ्यांनी एकूण रक्कम रुपये 90,000/- खर्च केलेली आहे. सदर खर्चास शासनाची मंजूरी घ्यावी व पुर्तता अनुपालन सादर करावे.

**4.3 संगणक व प्रिंटर खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, कणकवलीने सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये यशवंत पंचायत राज अभियान रक्कमेतून रक्कम रूपये 2,75,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/1008/प्र.क्र.148/पंरा-1, दिनांक 24/12/2009 नुसार बक्षिस रक्कमेच्या 30 टक्के रक्कम ही कार्यालय सजावट व कार्यालयाचे संगणकीकरण आणि बैठक व्यवस्था करणे कामी खर्च करावयाची, असे नमूद आहे. त्यानुसार रूपये 5,00,000/- पैकी रूपये 1,50,000/- रुपये खर्च करणे अपेक्षित असतांना रक्कम रूपये 95,000/- जादा खर्च केलेली आहे.

2) उर्वरित 95,000/- रुपये खर्च परिपत्रकातील अट क्रमांक 5 अन्वये संगणकासाठी वापरण्यात आलेली आहे. मात्र अट 5 मध्ये नमूद केलेप्रमाणे 45 टक्के बक्षिसाची रक्कम ही पंचायत राज संस्थेमधील इतर विकास कामे, सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम, शिक्षण आणि आरोग्य विषयक सुधारणा यासाठी वापरण्यात याव्या. यामध्ये पंचायत राज संस्थांमधील अंगणवाड्या, बालवाड्या आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांच्यातील सुधारणासाठी वापरणे आवश्यक होते. तथापि, संगणक खरेदीवर रक्कम रूपये 95,000/- खर्च झाल्याने शासन निर्णयातील टक्केवारी प्रमाणे खर्च झालेचे दिसून येत नाही.

3) सदर 5 संगणक व 3 प्रिंटरचे इन्स्टॉलेशन रिपोर्ट्स नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे संगणक खरेदी देयकात नमूद केले प्रमाणचे स्पेसिफिकेशन चेच असलेची खात्री करता येत नाही.

4) इन्स्टॉलेशन रिपोर्ट्स नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे देयकात नमूद केलेप्रमाणे WINDOWS 10 LICEN COPY ACTIVATE केलेची खात्री देता येत नाही.

**4.4 50 टक्के अनुदानावर शेतक-यांना पुरविलेल्या सौर इनव्हर्टर मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,83,030/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नमुना नंबर 33 ची पडताळणी केली असता साठा रजिस्टरला साहित्याची नोंद आहे. परंतु, बॅटरीचे वर्णन नमुद नाही.

2) लाभार्थी मंजूर यादी लेखापरीक्षणात उपलब्ध झालेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार वाटप साहित्य वापरात असल्याची खात्री करुन लाभार्थीच्या आर्थिक स्थितीचा अहवाल पर्यवेक्षकीय यंत्रणेने घेतलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक भा.क./1093 भा.ख.स./1093 प्र.क्र./1239/ 37, दिनांक 01/09/1993 नुसार परि.क्र.4 मधील लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला नसल्याची पडताळणी करता येत नाही.

5) 27 सौर ईनव्हर्टर पैकी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 2 शेतक-यांना सौर ईनव्हर्टरचे वाटप करण्यात आलेले नाही. तरी वाटप करुन पुर्तता दाखवावी.

6) जे सौर ईनव्हर्टर वाटप करण्यात आलेले आहेत, त्याची तारीख रजिस्टरला नमुद नाही. परिणामी विहीत मुदतीत साहित्याची वाटप झाल्याची खात्री देता येत नाही.

7) उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणात उपलब्ध झालेले नाही.

**4.5 हस्तांतरित योजना रोखवहीमधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 मधील नियम 57 नुसार रोख पुस्तकाप्रमाणे येणाऱ्या अखेरच्या शिलकेची रुजवात बँकेच्या अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या शिलकेशी करण्यात येईल आणि दोन्ही शिलकेतील फरकाचे विश्लेषण करण्याकरीता महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशी बँक ताळमेळ काढण्यात येईल. हस्तांतरित योजना रोखवहीमध्ये मासिक गोषवारे काढले आहेत. सदर मासिक रकमांचा रोखवही व बँक पासबुक मध्ये ताळमेळ घेतला असता तफावत दिसून येते. नियम 57 नुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

सदर तफावत असल्यामुळे अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर तफावत का येते, याचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता, 1968 मधील नियम 6 नुसार पंचायत समितीचे लेखे व वित्तीय अभिलेख योग्य रीतीने व बरोबर ठेवले आहेत आणि ते अद्यावत आहेत, याबद्दल खात्री करून घेण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची आहे. परंतु, लेखापरीक्षण होईपर्यंत कोणीही या बाबीकडे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. सदर बाब गंभीर आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 12 नुसार अभिलेख्यातील प्रत्येक दुरुस्ती व्यवस्थितपणे शाईने करण्यात येईल. (दुरुस्त करावयाच्या मूळ नोंदीमधून एक रेघ मारण्यात येईल) आणि गटविकास अधिकारी यांच्या दिनांकित आद्याक्षरीने ती अनुप्रमाणित करण्यात येईल. हस्तांतरित योजना रोखवहीमध्ये अनेक ठिकाणी खाडाखोड केली आहे व उपरीलेखन केलेले आहे. त्या ठिकाणी नियम 12 नुसार कार्यवाही केलेली नाही.

3) रोखवहीमध्ये एका दिवसाची अखेरची शिल्लक रक्कम पुढच्या दिवशी सुरुवातीची शिल्लक असते. हस्तांतरित योजना रोखवहीमध्ये अखेरची शिल्लक रक्कम व सुरवातीची शिल्लक रक्कम यामध्ये तफावत आहे.

4) रोखवहीमधील गोषवारे गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी करून प्रमाणित केलेले नाहीत. न वटलेले धनादेश याद्यांवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

5) रोजकीर्द नमुना नंबर 7 भाग 2 पृष्ठ क्रमांक 21 वर खर्च बाजूला दिनांक 14/03/2017 रोजी रक्कम रुपये 2,424/- व रुपये 91,362/- तसेच दिनांक 15/03/2017 रोजी रक्कम रुपये 1,867/- वजा (MINUS) नोंद घेतली आहे. सदर नोंदी ह्या अतिप्रदान वसुलीच्या आहेत. परंतु, नोंदीसमोर सदर अतिप्रदान कोणत्या प्रमाणकाने झाले, याची नोंद न केल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

6) खर्च रकमेच्या बेरजेत तफावत आढळून आली.

7) दिनांक 30/03/2017 रोजी अखेरची शिल्लक रूपये 70,53,403/- एवढी असताना दिनांक 31/03/2017 रोजीच्या गोषवारामध्ये आरंभीची शिल्लक रूपये 63,50,349/- घेण्यात आली आहे. त्यामध्ये रक्कम रुपये 7,03,054/- ची तफावत दिसून येते.

8) दिनांक 31/03/2017 रोजी जमा बाजूला रक्कम रुपये 7,279/-, 1,11,075/-, 27,474/-, 7,81,592/- व 24,329/- अश्या एकूण रुपये 9,51,749/- च्या वजा (minus) नोंदी घेतल्या आहेत. पासबुक मध्ये दिनांक 31/03/2017 रोजी रक्कम रुपये 9,51,749/- खर्च दिसून येतो. सदर नोंदीबाबत खुलासा सादर करावा.

सदर अनियमिततामुळे अपहार झाला नसल्याची खात्री लेखापरीक्षणास पटवावी. याबाबत योग्य पुराव्यासह लेखापरीक्षणास खुलासा सादर करावा.

**4.6 9w LED Solar Street Light पुरवठा करणेमधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** याबाबत रक्कम रुपये 1,34,316/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त दरपत्रकापैकी प्रवीण सोलर सिस्टिम, नाशिक व झेनिथ एनर्जी सिस्टिम, रत्नागिरी यांचे लखोटे आवक क्रमांक एकच दिसून येतात.

2) पुरवठा आदेशात ग्रामपंचायत उभादांडा, ग्रामपंचायत रेडी, ग्रामपंचायत मातोंड, ग्रामपंचायत वायंगणी, ग्रामपंचायत म्हापण, ग्रामपंचायत परुळे व ग्रामपंचायत तुळस यांना पथदीप पुरवठा करणेच आदेश आहे. परंतु, पोहोच वरून ग्रामपंचायत कुशेवाडा, ग्रामपंचायत वजराठ व ग्रामपंचायत आडेली यांना पुरवठा केला आहे. याबाबत खुलासा करावा.

3) सदर ग्रामपंचायतच्या जंगम मालमत्ता नोंदवहीवर नोंद घेऊन त्याची साक्षांकित प्रत लेखापरीक्षणास सादर करावी.

4) पुरवठा केलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल नस्तीसोबत नसल्यामुळे दर्जाची खात्री करता आली नाही.

**4.7 वय वर्ष 21 पूर्ण झालेनंतर ही निवृत्तीवेतन प्रदान केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, सटाणा सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात निवृत्ती वेतन विभागाकडील माहे मार्च 2017 या महिन्यात माहे फेब्रुवारी 2017 या महिन्यातील प्रदान निवृत्ती वेतन खर्चाची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, 1982 नियम 116 (5) (दोन) नुसार मुलाच्या बाबतीत त्याच्या वयाला एकवीस वर्षे पुर्ण होईपर्यंत आणि नियम 116 (5) (तीन) अविवाहीत मुलीच्या बाबतीत ती चोवीस वर्षे वयाची होईपर्यंत किंवा तिचा विवाह होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत कुटूंब निवृत्तीवेतन प्रदेय होईल.

चि.चेतन यास दिनांक 15/02/2015 पर्यंत कुटुंब निवृत्ती वेतन प्रदान करून त्यानंतर कुटुंब निवृत्ती वेतन बंद करणे आवश्यक होते. तथापि, फेब्रुवारी 2017 पर्यंत कुटुंब निवृत्ती वेतन प्रदान केल्यामुळे परिशिष्ट क्रमांक 4 मध्ये दर्शविलेप्रमाणे रुपये 2,25,401/- जादा प्रदान झालेले आहे. सदर ज्यादा प्रदानाची रक्कम वसूल करून शासन लेखाशिर्षात भरणा करावी .

**4.8 श्रीमती यमुनाबाई हिरामण पाटील यांना वाढीव दराने कुटूंबनिवृत्ती वेतन प्रदान केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, मालेगाव सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात, सामान्य प्रशासन विभागाकडील प्रमाणक क्रमांक 75 दिनांक 09/03/2017 अन्वये प्रदान केलेल्या निवृत्ती वेतन देयकांची तपासणी करतांना श्रीमती यमुनाबाई हिरामण पाटील (मयत हिरामण बाजीराव पाटील यांची पत्नी) यांना रुपये 4,600/- प्रमाणे कुटूंब निवृत्ती वेतन प्रदान केले जात असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सेवानिवृत्ती वेतन धारक हिरामण बाजीराव पाटील हे दिनांक 31/07/2005 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असून मयत दिनांक 29/04/2012 आहे. त्यांचा जन्म दिनांक 04/02/1946 असून त्यांच्या वयाची 65 वर्ष 03/02/2011 अखेर पूर्ण होतात त्यामुळे श्रीमती यमुनाबाई हिरामण पाटील यांना कुटुंब निवृत्ती वेतन दिनांक 30/04/2012 पासून रुपये 2,882/- या सर्वसाधारण दराने देय होते. परंतु, प्रत्यक्षात रुपये 4,600/- ने कुटुंब निवृत्ती वेतन अदा केल्याने 30/04/2012 ते 31/08/2017 या कालावधीत रक्कम रूपये 2,27,008/- अतिप्रदान झालेले आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव यांनी विवरणपत्रात नमूद मूळ निवृत्ती वेतन व त्यावरील वेळोवेळी अनुज्ञेय महागाई भत्ता याची प्रथम खात्री करून अतिप्रदानाची रक्कम रुपये 2,27,008/- संबंधिताकडून वसुल करण्यात येवून शासन सदरी भरणा करावी.

**4.9 श्रीमती सिंधुबाई रघुनाथ मोरे यांना वाढीव दराने कुटूंबनिवृत्ती वेतन प्रदान केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती, मालेगाव सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात, शिक्षण विभागाकडील फेब्रुवारी 2017 देय मार्च 2017 चे निवृत्ती वेतन देयकांची तपासणी करतांना श्रीमती सिंधुबाई रघुनाथ मोरे (मयत रघुनाथ उमाजी मोरे यांची पत्नी) यांना रुपये 7,996/- प्रमाणे कुटूंब निवृत्ती वेतन प्रदान केले जात असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सेवानिवृत्ती वेतन धारक रघुनाथ उमाजी मोरे हे दिनांक 30/04/2005 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असून मयत दिनांक 06/08/2013 आहे. त्यांचा जन्म दिनांक 01/05/1947 असून त्यांच्या वयाची 65 वर्ष दिनांक 30/04/2012 अखेर पूर्ण होतात. त्यामुळे श्रीमती सिंधुबाई रघुनाथ मोरे यांना कुटुंब निवृत्ती वेतन दिनांक 07/08/2013 पासून रुपये 4,798/- या सर्वसाधारण दराने देय होते. परंतु, प्रत्यक्षात रुपये 7,996/- ने कुटुंब निवृत्ती वेतन अदा केल्याने दिनांक 07/08/2013 ते 31/08/2017 या कालावधीत रक्कम रुपये 3,38,410/- अतिप्रदान झालेले आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव यांनी विवरणपत्रात नमूद मूळ निवृत्ती वेतन व त्यावरील वेळोवेळी अनुज्ञेय महागाई भत्ता याची प्रथम खात्री करून अतिप्रदानाची रक्कम रुपये 3,38,410/- संबंधिताकडून वसुल करण्यात येवून शासन सदरी भरणा करावी.

**4.10 प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक सहावा वेतन आयोग फरक देयकातील रक्कम दुबार प्रदान झाले बाबत.**

**पंचायत समिती त्रंबकेश्वर, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती, त्रंबकेश्वर सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे शिक्षण विभागातील प्रमाणकांची तपासनी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 310 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 1,68,17,669/- या देयकाची तपासणी करतांना सहाव्या वेतन आयोग 1 ते 5 हाप्त्यांची फरकासह रक्कम प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापकांना अदा करण्यांत आलेली आहे. 4 कर्मचा-यांचे जिल्हा परिषद स्तरावर नमुना नंबर 88 व 89 मधील नोंदीची सदर देयकाशी पडताळणी केली असता संबधितांना 1, 2, 3 भविष्य निर्वाह निधी हप्त्यांची रक्कम माहे जुन 2015 मध्ये अदा करण्यांत आलेली आहे. पंचायत समिती, त्रंबक यांनी संबधितांना उपरोक्त प्रमाणकांन्वये पुन्हा 1, 2, 3 भविष्य निर्वाह निधी हप्त्याच्या रक्कमा दुबार अदा करण्यांत आलेल्या आहे.

2) वरील प्रमाणक निवडक महिन्यांती आहे. या व्यतिरिक्त संन 2016-2017 मध्ये अदा केलेल्या फरकांचे बिलांमध्ये अशीच दुबार फरक अदा झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सहाव्या वेतन आयोगांची देयकांची तपासणी पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरांवरुन करुन संबधितांना जादा प्रदान हप्त्यांची खात्री करुन रक्कमा दुबार अदा झाल्या असल्यास रक्कमां त्वरीत वसुल करुन शासन सदरी भरणा करुन पुर्तता दाखवावी.

3) वरील 4 कर्मचा-यांची माहिती उदाहरणादाखल असून ब-याच कर्मचा-यांचे सहावा वेतन आयोगाच्या हप्त्यांची फरकाची रक्कम जमा मुळ सेवापुस्तकात नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. सदर बिल यापुर्वी सादर अथवा अदा केले किंवा नाही, याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर बिलातील वरील कर्मचा-यांचे सहावा वेतन आयोगाच्या पाचव्या हफ्त्यांची जिल्हा परीषद भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या रकमांचे विवरणपत्र लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाही. मागील भविष्य निर्वाह निधी खाते उतारा अप्राप्त आहे.

**4.11 जिल्हा परीषद कर्मचारी परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणीबाबत.**

**पंचायत समिती राहुरी, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विकासाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो 1007/प्र.क्र.181/आस्था-11/ दिनांक 21/05/2010 नुसार वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो 1005/सेवा 4, दिनांक 31/10/2005 अन्वये दिनांक 01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर कर्मचारीकरीता नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु केली आहे. त्या अनुषंगाने पंचायत समिती व त्याअंतर्गत विभागाचे दिनांक 01/11/2005 रोजी व त्यानंतर कर्मचा-यांचे परिभाषीत अंशदान वसुली केली आहे. तथापि, दिनांक 31/10/2005 वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो 1005/126/सं.क.4, दिनांक 31/10/2005 च्या शासन निर्णयामधील अनुक्रमांक 7 ते 32 प्रमाणे कार्यवाहीचे अभिलेखे पडताळणीसाठी उपलब्ध केले नाही.

**4.12 निवृत्ती वेतनाचे दर बदल लागु न करता मुळ मंजूर निवृत्ती वेतनावरच रक्कम प्रदान केलेबाबत**

**पंचायत समिती जामखेड, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, जामखेड अंतर्गत शिक्षण व सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची व कर्मचा-यांची कुटुंब निवृत्ती वेतन प्रकरणाची पडताळणी केली असता रत्नमाला सुर्यकांत आगलावे, पी.पी.ओ. 10672/010 या कुटंब निवृत्ती वेतनधारकांचे दिनांक 07/11/2016 पासून निवृत्ती वेतन दरात बदल करणे आवश्यक असतांना तसा बदल न केल्याने त्यांना निवृतीवेतन व त्यावरील महागाई भत्यांचे अतिप्रदान झालेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 116 (4)(ए)(एक) अन्वये शासकीय कर्मचा-याच्या मृत्युच्या दिनांकानंतरच्या दिनांकापासून सात वर्षाच्या कालावधी किंवा मृत शासकीय कर्मचारी हयात राहिला असता, तर तो ज्या दिनांकास 65 वर्षे वयाचा झाला असता, त्या दिनांकापर्यंतचा कालावधी, यापैकी कमी असेल, त्या कालावधीसाठी निवृत्ती वेतन देय होईल. परंतु, उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सदर कालावधीनंतर निवृत्ती वेतन दरात बदल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे संबधित कुटुंब निवृत्ती वेतन धारकांना कुटुंब निवृत्ती वेतनाचे रूपये 1,05,447/- अतिप्रदान झालेले आहे. सदर कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे दर बदल करण्यात येऊन अतिप्रदानाची वसुली करण्यात येवून अनुपालन दर्शवावे

तसेच मयत निवृत्ती वेतनधारकाचे मयत दिनांकानंतरचे निवृत्तीवेतन बँक खात्याकडे जमा असलेले रक्कमा वसुल होणे बाकी आहे. त्या सर्व रक्कमा वसुल करण्यात येवून अनुपालन दर्शवावे

**4.13 संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करता वेतनवाढी अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, श्रीगोंदा यांचेकडील सन 2016-2017 या लेखापरीक्षण कालावधीमध्ये पंचायत समितीकडील आस्थापना 2 सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, 7 कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करुनही त्यांना वेतनवाढी अदा केलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/01/2001 रोजी किंवा त्यापूर्वी पासून सुरु झालेली आहे अशा शासकीय अधिकारी / कर्मचा-यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत तसेच सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचा-यांनी दिनांक 31/12/2007 पूर्वी परिक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीपर्यंत किंवा ते संगणक हाताळणी / वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यंत वेतनवाढी रोखण्यास पात्र ठरतील व वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही, असे नमुद केलेले आहे.

**4.14 एम.एस.सी.आय.टी.परीक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी मंजूर केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, संगमनेरच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणाच्या वेळी आरोग्य विभागाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र सेवापुस्तकांची तपासणी केली असतांना लेखापरीक्षण अहवालातील परिशिष्टानुसार कर्मचारी एम.एस.सी.आय.टी. (संगणक) परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. कर्मचारी हे संगणक परीक्षा उत्तीर्ण नसल्याने त्यांचे दिनांक 01/01/2008 ते लेखापरीक्षण कालावधी/परीक्षा पास होईपर्यंतचे पुढील 8 वेतनवाढी व त्यानुसार प्रदान केलेले वेतन भत्ते रक्कम रूपये 51,88,338/- वसूल पात्र आहेत.

2) त्याचप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 3 चे परिशिष्ट एक मधील नियम क्रमांक 1(1) चा (क) तसेच परिशिष्ट चार मधील भाग-ब, उपविभाग (1) मधील नियम क्रमांक 18 आणि 19 (3) नुसार, जिल्हा परिषदेचे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे / कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण दरवर्षी करुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अंतर्गत लेखापरीक्षणा अभावी प्रभावी वित्तीय नियंत्रण राहू शकत नाही. तसेच नियमितपणे अशी पडताळणी होत नसल्याने, वरीलप्रमाणे आवश्यक ती परीक्षा उत्तीर्ण नसतांनाही दिलेल्या वेतनवाढीमुळे झालेली अतिप्रदानाची प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत व शासनाचे आर्थिक नुकसान होत असते.

**4.15 एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 40) -** पंचायत समिती, राहाता येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणावेळी शिक्षण विभागामधील सेवापुस्तकांच्या पडताळणीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 मधील अनुक्रमांक 3 (1) मध्ये नमूद केल्यानुसार विहित कालावधीत संगणक परीक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनवाढी सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सुट देण्यात येईपर्यंत किंवा त्यांनी संगणक हाताळणी / वापरापबाबतचे विहित प्रमाणपत्र उपबघ करुन देईपर्यंत रोखण्यात येतील. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती 04/ 224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये संगणक अर्हता प्राप्त करण्यासाठी दिनांक 31/12/2007 पर्यंतच अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक 19/03/2003 पूर्वी नियुक्त झालेले जे कर्मचारी दिनांक 31/12/2007 पर्यंत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत. त्यांच्या दिनांक 01/01/2008 पासून वेतनवाढी रोखणे आवश्यक होत्या. तथापि, तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. 8 कर्मचारी उशीराने परीक्षा पास झाल्याचे आढळून आले.

तसेच इतर कर्मचा-यापैकी वरील शासन निर्णयांचा भंग केला असल्यास त्यांच्यावर देखील उक्त शासन निर्णयाप्रमाणे वसुलीची कार्यवाही करून अनुपालन लेखापरीक्षणास सद्दर करावे.

**4.16 MS-CIT परीक्षा उत्तीर्ण नसलेबाबत.**

**पंचायत समिती हवेली, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, हवेली सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये MS-CIT परीक्षा उत्तीर्ण नसलेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, हवेली कडील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणात ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामसेवकांची सेवापुस्तके तपासली असता जे कर्मचारी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मानस/नस्ती/04/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये MS-CIT परीक्षा उत्तीर्ण नसतील त्यांच्या वेतनवाढी रोखण्यात याव्यात, असे आदेश असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामूळे 5 कर्मचा-यांना वेतन व भत्यांचे जादा प्रदान झाले आहे.

**4.17 ई- गव्हर्नन्सच्या तरतुदीतून बायोमॅट्रिक मशिन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, खेड यांनी उपकर निधीमधून ई-गव्हर्नन्सच्या तरतुदीतून बायोमॅट्रिक मशिन खरेदी यासाठी प्रमाणक क्रमांक 53, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 41,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणकाने पंचायत समितीने कार्यालयीन उपयोगासाठी खर्च केला आहे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 101 चे परिशिष्ट 2 मध्ये उपकरातून विकास विषयक कोणत्या कामासाठी व बाबीवर खर्च करावा हे स्पष्टपणे नमूद असताना उपकर निधीतून वरील बाबीवर खर्च करता येत नसताना बायोमॅट्रिक मशिन खरेदीतील या बाबींवर नियमबाह्यरीत्या खर्च करणेत आलेला आहे. उपकर रकमेतून कार्यालयासाठी दैनंदिन वापरासाठी करावा लागणारा खर्च करता येत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे केलेला खर्च नियमबाह्य आहे. तो वसूल करून उपकर निधीमध्ये जमा करणेबाबत कार्यवाही करावी.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्रक्र.82/भाग-3/ दिनांक 30/10/2015 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए /2009/प्र.क्र.-505/वित्त-9, दिनांक 06/08/2009 नुसार बायोमॅट्रिक मशिनसाठी भांडार खरेदी संगटनेकडून दरकरार उपलब्ध असताना दरकारानुसार खरेदी करणे बंधनकारक असताना तशी खरेदी न करता नियमबाह्यरीत्या खरेदी केलेली आहे.

3) सदर खरेदीबाबत पंचायत समिती ठराव प्रत उपलब्ध झालेली नाही.

4) सदर खरेदी प्रक्रिया माहे मार्च-2016 मधील असताना देयक मात्र माहे मार्च-2017 म्हणजेच तब्बल एक वर्षानंतर अदा केल्याने दुबार देयक अदायगी झालेची शक्यता नाकारता येत नाही.

5) तसेच साठा नोंदवही नमुना नंबर 33 उपलब्ध झाले नसल्याने साहित्याबाबत खात्री करता येत नाही.

6) सन 2015-2016 मध्ये ई - गव्हर्नन्सची तरतुद केली होती काय? असल्यास सदर देयक त्या कालावधीमध्ये अदा का करण्यात आले नाही?

**4.18 ई- गव्हर्नन्सच्या तरतुदीतून इंटरकॉम सुविधा व सी.सी. टी. व्ही. कॅमेरा खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, खेड यांनी उपकर निधीमधून ई - गव्हर्नन्सच्या तरतुदीतून बायोमॅट्रिक मशिन खरेदी यासाठी 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,54,727/- खर्च करण्यात आला आहे.

1) वरील प्रमाणकाने पंचायत समितीने कार्यालयीन उपयोगासाठी खर्च केला आहे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 101 चे परिशिष्ट 2 मध्ये उपकरातून विकास विषयक कोणत्या कामासाठी व बाबीवर खर्च करावा, हे स्पष्टपणे नमूद असताना उपकर निधीतून वरील बाबीवर खर्च करता येत नसताना इंटरकॉम सुविधा व सी.सी. टी व्ही. कॅमेरा या बाबींवर नियमबाह्यरीत्या खर्च करणेत आलेला आहे. उपकर रकमेतून कार्यालयासाठी दैनंदिन वापरासाठी करावा लागणारा खर्च करता येत नाही त्यामुळे वरीलप्रमाणे केलेला खर्च नियमबाह्य आहे. तो वसूल करून उपकर निधीमध्ये जमा करणेबाबत कार्यवाही करावी.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्रक्र.82/भाग-3/ दिनांक 30/10/2015 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपिए /2009/प्र.क्र.-505/वित्त-9, दिनांक 06/08/2009 नुसार बायोमॅट्रिक मशिनसाठी भांडार खरेदी संघटनेकडून दरकरार उपलब्ध असताना दाराकारानुसार खरेदी करणे बंधनकारक असताना तशी खरेदी न करता नियमबाह्यरीत्या खरेदी केलेली आहे.

3) सदर खरेदीबाबत पंचायत समिती ठराव प्रत उपलब्ध झालेली नाही.

4) सदर खरेदी प्रक्रिया माहे मार्च-2016 मधील असताना देयक मात्र माहे मार्च-2017 म्हणजेच तब्बल एक वर्षानंतर अदा केल्याने दुबार देयक अदायगी झालेची शक्यता नाकारता येत नाही.

5) तसेच साठा नोंदवही नमुना नंबर 33 उपलब्ध झाले नसल्याने साहित्याबाबत खात्री करता येत नाही.

6) सन 2015-2016 मध्ये ई - गव्हर्नन्सची तरतुद केली होती काय? असल्यास सदर देयक त्या कालावधीमध्ये अदा का करण्यात आले नाही? तसेच सन 2016-2017 तरतुदीमध्ये या देयकाचा समावेश केला आहे किंवा कसे? पंचायत समितीने याबाबत ठराव घेतला आहे किंवा नाही?

7) दरपत्रके मागविणेबाबतची पत्र जाक्र.पंस/प्रशासन/ 214 व 215, दिनांक 04/03/2017 नुसार आठ दिवसात म्हणजेच 12/03/2017 अखेर दरपत्रके प्राप्त होणे अनिर्वाय असताना दरपत्रके पाकिटांवर प्राप्त दिनांक 15/03/2017 असे निदर्शनास आले आहे. सबब दरपत्रके प्रक्रिया पुन्हा राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) दरपत्रके मागविताना इंटरकॉम सुविधा व सी.सी. टी व्ही. कॅमेरा यांचा सविस्तर तपशील नमुद केलेला नाही. मागणी कोणत्या स्वरुपाची आहे, हेच दरपत्रके मागविताना नमुद नसताना दरपत्रके प्राप्त झाली कशी?

इंटरकॉम दरपत्रकामध्ये अॅल्बा ऑफीस अॅटोमेशन यांचे दर कमी होते, तर सी.सी. टी.व्ही कॅमेरा दरपत्रकामध्ये परफेक्ट कम्युनिकेशन यांचे दरपत्रक कमी असताना पुरवठा आदेश सोहम एंटरप्रायजेस यांना कशाचे आधारे देण्यात आला?

**4.19 ग्रामपंचायतीचे दप्तर व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर न केलेबाबत.**

**पंचायत समिती सातारा, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समितीने 2016-2017 मध्ये मौजा विहिरगाव, वार्ड नंबर 03 मध्ये सिमेंट रस्ता बांधकामाकरीता 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 7,50,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, साताराचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणावेळी ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामपंचायतींनी सन 2016-2017 मध्ये मार्च 2017 अखेर लेखापरीक्षणासाठी एकुण 22 ग्रामपंचायतींनी दप्तर तपासणीस उपलब्ध करुन दिले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत:-

1) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 सन 1959 च्या मुंबई अधिनियम क्रमांक 3 कलम 176(2) खंड 41 अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणीचे नियम 1961 नुसार ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून करण्यात येते. त्यास अनुसरुन ज्या गौण व मुख्य पंचायतींचे हिशोब तपासणी असे वर्गीकरण नियम 4 अनुसार करण्यात आले आहे, त्यानुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास ग्रामपंचायतीचे दप्तर व अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न केल्यामुळे त्यांचे लेखापरीक्षण झाले नाही. पर्यायाने लेखापरीक्षणाचा उद्देश सफल झालेला नाही. लेखापरीक्षणाअभावी त्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च योग्य प्रकारे झालेला आहे किंवा कसे, हे प्रमाणित होत नाही.

तरी सदर ग्रामपंचायतींनी दप्तर लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्यामुळे त्या ग्रामपंचायतींवर योग्य ती कार्यवाही करुन तशा प्रकारचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

**4.20 ग्रामपंचायतींना हायमॉस लँप खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती वाई, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामपंचायतींना हायमॉस लँप खरेदीवर रक्कम रूपये 5,98,899/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 20 संकिर्ण लेखाशिर्षाखाली ग्रामपंचायतींना हायमॉस लँप बसविणे योजना घेतलेली असून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 अनुसूची 2 मध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे ती कोणत्या आधारे घेण्यात आली? याबाबत साधार पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

2) उपरोक्त नमूद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 878 नुसार 60 वॅटचे, 30 फूट उंचीचे हायमॉस लँप बसविणेबाबत मंजूरी असताना सदर योजनेचे दोन भाग करुन 60 वॅट व 150 वॅट अशी दोन वेगवेगळी कामे दर्शवून दोन तांत्रिक मान्यता दिलेल्या आहेत. वास्तविक एकच योजना असताना व शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 31/03/2013 नुसार 5 लक्ष पर्यंतच्या तांत्रिक मंजूरी देण्याचे आदेश गटविकास अधिकारी यांना असताना योजनेचे नियमबाहयपणे दोन भाग करुन स्वतंत्र तांत्रिक मंजूऱ्या देणे, ही गंभीर अनियमितता आहे.

3) योजनेचे दोन स्वतंत्र भाग करुन सदर खरेदीसाठी स्वतंत्र दरपत्रके मागवून पुरवठादार निश्चित केलेला असून शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 25/03/2015 नुसार 3 लक्षपेक्षा अधिक रकमेच्या खरेदीसाठी ई निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असताना नियबाहयपणे दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आलेली आहे.

4) सर्वसाधारण सभेने 60 वॅटचे लॅंप घेणे निश्चित केलेले असताना दरपत्रके ही वेगवेगळया वॅटच्या लॅंपची म्हणजेच 55, 50, 60, 72, 150, 90 वॅट ची अशी असताना ती मान्य करुन पुरवठादार निश्चित केला आहे. 60 वॅटचे लॅंप घेण्यास मान्यता असताना 150 वॅटचे लॅंप कोणत्या कारणास्तव खरेदीसाठी प्रस्तावित केले? याबाबत कोणताही समर्पक खुलासा देण्यात आला नाही.

5) दरपत्रके दिनांक 15/06/2016 ते 20/06/2016 या कालावधीत आलेबाबत आवक शिक्के पाकीटावर असून पंचायत समितीची आवक नोंदवही तपासता सदर कालावधीत संबंधीत पुरवठादारांकडून दरपत्रके अथवा पत्रे आलेबाबतची कोणतीही नोंद दिसून येत नाही. यावरुन संपूर्ण दरपत्रके मागणी व खरेदी प्रक्रिया विहीत पध्दतीनुसार झालेचे दिसून येत नाही.

6) सदर खरेदी प्रक्रिया करताना याबाबत शासन दरकरार अथवा महाराष्ट्र उर्जाविकास संस्था यांनी केलेला दरकरार व त्यामधील दर यांची तुलना करणे आवश्यक असताना अशी कोणतीही पडताळणी केलेचे दिसून येत नाही.

7) बावधन, खोलवडी, निकमवाडी व आसरे ग्रामपंचायतींसाठी 60 वॅटचे हायमॉस लॅंप तर भोगाव, ओझर्डे, व मोहोडेकरवाडी ग्रामपंचायतींसाठी 150 वॅटचे लॅंप खरेदी करण्यामागील निश्चित कारणांचा बोध होत नाही. सर्व ग्रामपंचायतींसाठी 60 वॅटचेच लॅंप खरेदी केले असते, तर आणखी एक लॅंप एका गावास जादा देता आला असता. तथापि, कोणतेही सबळ कारण नसताना अनावश्यकपणे जादा वॅटचे लॅंप कमी लॅंप खरेदी केलेने रूपये 74,850/- चे नुकसान झाले असून संबंधीत ग्रामपंचायतीसही त्यामुळे जादा वीज बीलाचा भुर्दंड पडणार आहे.

8) हायमॉस लॅंप पुरविलेल्या सातही ग्रामपंचायतींची सदर साहित्याबाबतची मागणी, साहित्य मिळालेबाबतची पोहोच, ग्रामपंचायत जडसंग्रह नोंदवहीतील नोंद क्रमांक इत्यादी कोणत्याही बाबी घेण्यात आलेल्या नाहीत.

9) ग्रामपंचायत बावधन यांना नागरी जनसुविधा योजनेअंतर्गत हायमॉस लॅंपसाठी सन 2016-2017 मध्ये प्रमाणक क्रमांक 31 दिनांक 31/08/2016 ने रूपये 7,20,000/- इतके अनुदान मंजूर असताना पुन्हा त्याच ग्रामपंचायतीस हायमॉस लॅंप दिलेने ग्रामपंचायतीतून दुबार खर्च दर्शविण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तालुक्यातील दुसऱ्या ग्रामपंचायतींनाही याचा लाभ देणे शक्य असताना एकाच ग्रामपंचायतीस जादा लाभ मंजूर करणे अनुचित आहे. तसेच एकाच गावासाठी दोन वेगवेगळया योजनांमधून एकाच प्रकारच्या कामासाठी खर्च करणे संयुक्तिक नाही.

10) संबंधीत ग्रामपंचायत हद्दीत बसविण्यात आलेले लॅंप कोणत्या योजनेतून व किती खर्च करुन बसविले? याबाबत माहिती सामान्य जनतेस होण्यासाठी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 08/06/2009 नुसार संबंधीत खांबावर माहितीदर्शक फलक बसविणे आवश्यक असताना तशी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.21 ग्रामपंचायतीचे दप्तर व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर न केलेबाबत**. (**थकीत प्रलंबित घटकांबाबत**.)

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या नियम क्रमांक 3 कलम 176(2) खंड 41 या अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत हिशोब तपासणी नियम 1961 नुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून प्रती वर्षी ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण करण्यात येते. त्यानुसार फलटण पंचायत समितीच्या सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात ग्रामपंचातीकडील एकुण 29 घटकांचे सन 1989-1990 ते 2007-2008 ते 2008-2009 वित्तीय वर्षातील ग्रामपंचायतीचे दप्तर, अभिलेखे लेखापरीक्षणास उपलबध केलेले नाहीत. ग्रामपंचायतीचे दप्तर वेळोवेळी उपलब्ध न झाल्याने शासनाच्या रकमा बऱ्याच प्रमाणात लेखापरीक्षणाविना गुंतुन राहिलेल्या आहेत. त्यामुळे लेखापरीक्षणाचा

उद्देश साध्य झालेला नाही. तसेच त्या त्या वित्तीय वर्षातील ग्रामपंचायतीचे उत्पन्न व खर्च योग्य प्रकारे झाला किंवा कसे, हे प्रमाणित न होणे, ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक लेखाप2013(7/13) वित्त-8, दिनांक 19/02/2013 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखप-2013/प्र.क्र.81/वि-5, दिनांक 18/02/2014 व मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 ची सुधारणा अधिनियम 2011 चे कलम 8 नुसार दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

### 4.22 पवनचक्की थकबाकीबाबत (दिनांक 31/03/2017)

**पंचायत समिती माण, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, माण ने दिलेल्या माहितीनुसार माण तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीत 174 पवनचक्क्या असून त्यांचेकडून रक्कम रूपये 44,44,500/- कराची थकबाकी दिनांक 31/03/2017 अखेर आहे.

सदरची थकबाकी मोठया प्रमाणावर असल्याचे दिसते. वसुलीअभावी ग्रामपंचायतीच्या विकासावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरची वसुली 100 टक्के करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना सुचना देऊन वसुल केल्याची पुर्तता दाखवावी.

### 4.23 अफरातफर प्रकरणाबाबत

**पंचायत समिती खटाव, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 35) -** पंचायत समिती, खटावचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात अफरातफर नोंदवहीची तपासणी केली असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/2012/प्र.क्र.104/आस्था 12, दिनांक 20/04/2012 अन्वये परिशिष्ट 2 मध्ये ग्रामंपचायत प्रलंबित अफरातफर प्रकरणाचे अढावा घेऊन ते निकाली काढण्याचे ठोस व कालबध्द उपाययोजना करावे. तसेच वरील शासन निर्णय परिशिष्ट 3 मध्ये जिल्हा परिषदेने निकाली काढलेली प्रकरणे विभागीय आयुक्तांना सादर केल्याचे लेखापरीक्षणास दाखवावे.

2) पंचायत समिती, खटाव, ग्रामपंचायत विभागाकडे अहवालासोबत परिशिष्ट क्रमांक 1 नुसार ग्रामपंचायतीची अफरातफर प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये एकूण 90,26,093/- गुंतलेली आहे. तरी सदर रक्कम वसुलीबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

### 4.24 ग्रामपंचायतीकडील अपहार प्रकरणांबाबत.

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, कराड चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण कालावधीत ग्रामपंचायत विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार खालीप्रमाणे दिनांक 31/03/2017 अखेर एकूण 03 ग्रामपंचायतीमधील 05 अपहार प्रकरणांमध्ये एकूण रक्कम रुपये 45,95,575/- इतकी रक्कम गुंतून राहिलेचे नमूद केले आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कराड अंतर्गत एकूण 03 ग्रामपंचायतींमध्ये एकूण रक्कम रुपये 45,95,575/- चा अपहार झाल्याचे दिसून येते. याबाबत योग्य तो पाठपुरावा करुन अपहारीत रक्कम रुपये 45,95,575/- त्वरीत वसुली करुन लेखापरीक्षणास पुर्तता दाखवावी.

### 4.25 अफरातफर प्रकरणाबाबत.

**पंचायत समिती पाटण, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास/2012/प्र.क्र.104/आस्था 1, दिनांक 20/04/2012 अन्वये परिशिष्ट 2 मध्ये ग्रामंपचायत प्रलंबित अफरातफर प्रकरणांचा आढावा घेऊन ते निकाली काढण्याचे ठोस व कालबध्द उपाययोजना कराव्यात. तसेच वरील शासन निर्णय परिशिष्ट 3 मध्ये जिल्हा परिषदेने निकाली काढलेली प्रकरणे विभागीय आयुक्तांना सादर केल्याचे लेखापरीक्षणास दाखवावे.

2) पंचायत समिती, पाटण, ग्रामपंचायत विभागाकडे अहवालासोबत परिशिष्ट क्रमांक 1 नुसार एकूण 31 ग्रामपंचायतीची अफरातफर प्रकरणे प्रलंबित असून त्यामध्ये एकूण रक्कम रुपये 90,51,966/- गुंतलेली आहे. तरी सदर रक्कम वसुलीबाबत बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**4.26 विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्या मासिक दैनंदिनी तसेच ग्रामपंचायत तपासणी अहवालांबाबत.**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1500/प्र.क्र. 590/ 20, दिनांक 20/07/2001 नुसार गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी गटातील ग्रामपंचायतींच्या तपासणीचे काम वेळचेवेळी व विहीत मुदतीत करणे आवश्यक आहे. तथापि, सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात वारंवार मागणी करुनही विस्तार अधिकारी ग्रामपंचायत यांच्या मंजूर मासिक दैनंदिनी व ग्रामपंचायत तपासणीचे अहवाल लेखापरीक्षणास तपासणीस उपलब्ध् झालेले नाहीत. यावरुन उपरोक्त नमूद शासन परिपत्रकाचे पालन झालेचे दिसून येत नाही.

ग्रामपंचायतींची वेळोवेळी तपासणी केल्याने अपहार प्रकरणांचा लवकर निपटारा होतो. ग्रामपंचायतींची दप्तरे अदयावत राहतात. तसेच मोठया अनियमिततेस वाव रहात नाही. त्याचबरोबर ग्रामसेवक व सरपंच यांच्या विविध शंका व अडचणींचे वेळीच निराकरण करता येते. तथापि, तपासणी अहवाल उपलब्ध नसलेने संबंधितांनी ग्रामपंचायतीच्या अशा तपासण्या केल्याचे दिसून येत नाही.

ग्रामपंचायतींची तपासणी न करण्याच्या कारणांबाबत साधार खुलासा होणे व यापुढे शासन परिपत्रकानुसार ग्रामपंचायतींच्या तपासणीबाबत कार्यक्रम निश्चित करणेबाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**4.27 पंचायत समिती मेढा यांनी प्रतिनियुक्ती कालावधीत कायम प्रवासभत्ता अदा केलेबाबत.**

**पंचायत समिती जावली**, **जिल्हा सातारा**, **सन 2016-2017** (**परिच्छेद क्रमांक 22)** - पंचायत समिती**,** मेढा सन 2016-2017 चे लेखापरीक्षण कालावधीत ग्रामपंचायत आस्थापना विभागाचे तपासणी करतांना पंचायत समिती**,** मेढा ने प्रतिनियुक्तीने कृषी विभाग**,** जिल्हा परिषद, सातारा येथे कार्यरत कर्मचारी श्री. पी. जि. शेडगे**,** ग्रामसेवक यांना कायम प्रवासभत्ता अदा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डिएसआर 2010**/**प्र.क्र.178/ आस्था-5, दिनांक 09**/**12**/**2011 अन्वये राज्यातील सर्व परिषदेतील ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना दरमहा रूपये 1**,**100**/-** इतका कायम प्रवासभत्ता दिनांक 01/01/2012 पासून वेतनासोबत देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. तथापि, 15 दिवसांना पेक्षा जास्त रजा कालावधीच्या रजेवर असतांना त्यांना त्या महिन्याचा प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही. म्हणजेच सदर कर्मचारी हा कार्यक्षेत्रात (सज्जा) किमान 15 दिवस हजर असणे अपेक्षित आहे.

सदर कर्मचारी हे दिनांक 05/10/2012 पासून प्रतिनियुक्तीने कृषी विभाग**;** जिल्हा परिषद, सातारा येथे कार्यरत असतांना व प्रत्यक्षात सदर कर्मचारी हे कार्यक्षेत्रात (सज्जा) कार्यरत नसतांना**,** पंचायत समिती**,** मेढा यांनी शासन निर्णयाचे पालन न करता**,** सदर कर्मचा-याला उपरोक्तप्रमाणे कायम प्रवास भत्त्यापोटी रक्कम रुपये 59**,**400/- दिनांक 31/03/2017 अखेर अदा केली आहे.

उपरोक्त अनियमिततेबाबत पंचायत समिती, मेढा यांनी कार्यालयातून संबंधित कर्मचाऱ्याला कायम प्रवास भत्ता जादा अदा करणा-या, संबंधित जबाबदर कर्मचा-यांची जबाबदारी निश्चित करून, कर्मचा-यांकडून कायम प्रवास भत्ता रक्कम रूपये 59,400/- वसूल करून शासन खाती भरणा करून पूर्तता करण्यात यावी

**4.28 सभापती वाहन खर्चाबाबत.**

**पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, तासगावचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना सभापती यांचे वाहनावर रक्कम रूपये 1,40,983/- इतका खर्च इंधन व रूपये 42,520/- इतका खर्च वाहन दुरुस्तीवर केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जेईपी 1099/प्र.क्र.135/05, दिनांक 31/08/1999 नुसार वाहनावरील खर्च जिल्हा परिषद स्विय निधीतून करणे आवश्यक असताना हस्तांतर निधीतून केला आहे. ही बाब नियमबाह्य आहे. तरी सदर रक्कम वसूल करून पूर्तता दाखवावी

**4.29 ग्रामसेवक कामबंद आंदोलन कालावधीतील रजेबाबत व वेतन अदाईबाबत.**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, जत ग्रामपंचायत विभागाकडील कार्यरत ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी आपल्या संवर्गाच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक न झाल्यामुळे दिनांक 17/11/2016 ते दिनांक 03//12/2016 अखेर 16 दिवस एकूण 41 कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतला होता. सदर कालावधीत त्यांना रक्कम रूपये 62,13,174/- वेतन अदा केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक विभाग क्रमांक ग्रामसे 2016/प्र.क्र. 243/आस्था 7, दिनांक 29/11/2016 अन्वये आंदोलनात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ना काम ना वेतन तत्व लागू करावे, असे सूचित केले आहे. त्यामुळे संप कालावधीतील वेतन यांना प्रदान करता येणार नाही. परंतु, माहे नोव्हेंबर पेड इन डिसेंबर 2016 व डिसेंबर पेड इन जानेवारी 2017 या महिन्यातील संप कालावधीतील वेतन हे वेतन देयकातून त्यांना अदा केले आहे. तरी याबाबत खुलासा करावा.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक ग्रामसे-2016/प्र.क्र.243/ आस्था 7, दिनांक 15/04/2017 नुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच ग्रामसेवकांच्या सेवापुस्तकात आंदोलन कालावधीतील रजेची नोंद घेण्यात आलेली नाही.

**4.30 किमान वेतन प्रत्यक्षात मागणीपेक्षा जादा आदाई.**

**पंचायत समिती कवठे महांकाळ, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन सन 2016-2017 साठी रक्कम रूपये 40,98,000/- इतके अनुदान पंचायत समिती कवठे महाकाळसाठी वितरीत करण्यात आलेले होते. त्यापैकी पंचायत समिती स्तरावर रक्कम रूपये 36,75,600/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, दिनांक 03/08/2013 नुसार ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या वर्गवारीनुसार कर्मचारी आकृतीबंध राहील त्याचप्रमाणे वर्गवारी अ, ब, क, ड, ई करण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंध कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी जो खर्च येईल, त्यासाठी शासन एकूण खर्चाच्या 50 टक्के एवढे अनुदान देईल व उर्वरित 50 टक्के खर्च संबंधित ग्रामपंचायत करील. परंतु, ग्रामपंचायतीने प्रथम दरमहा आपल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन देतील व त्यानंतर शासनाच्या हिस्स्याच्या रकमेची प्रतीपूर्ती करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीची मागणी निश्चित स्वरुपात घेऊन तेवढीच रक्कम जिल्हा परिषद स्तरावर मागणी केलेली नाही.

2) ग्रामपंचायतीने मागणी केलेले लेखे तपासताना प्रत्यक्षात किमान वेतन केलेल्या मागणीपेक्षा जादा रक्कम अदा केलेल्या आहेत. मागणीपेक्षा जादा रक्कम कोणत्या आधारे दिल्या? याचा खुलासा करावा. त्यामुळे शासन निधीचे नुकसान झालेले आहे.

अशा प्रकारे पंचायत समिती स्तरावर मागणीपेक्षा जादा खर्च रक्कम रूपये 1,52,340/- झालेला आहे. संबंधित ग्रामपंचायतीकडून शासन निधी जादा झालेला खर्च वसूल होणे आवश्यक आहे वसूल करून शासन निधीत जमा करण्यात यावा.

3) ग्रामपंचायतींना रक्कम प्राप्त झाली असल्याबाबत नमुना नंबर 7 ची पावती कार्यालयात देणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधी अखेर प्राप्त झाले असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्राप्त रकमाबाबत पडताळणी करता आली नाही. रकमा प्राप्त झाल्याबाबतची पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावे.

**4.31 ग्रामसेवक कामबंद आंदोलन कालावधीतील वेतन अदा केलेबाबत.**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, शिराळा ग्रामपंचायत विभागाकडील कार्यरत ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी आपल्या संवर्गाच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक न झाल्यामुळे दिनांक 17/11/2016 ते दिनांक 03/12/2016 अखेर 17 दिवस एकूण 48 (ग्रामसेवक) कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग घेतला होता. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक विभाग क्रमांक ग्रामसे 2016/प्र.क्र. 243/ आस्था 7, दिनांक 29/11/2016 अन्वये आंदोलनात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ना काम ना वेतन तत्व लागू करावे, असे सूचित केले आहे. त्यामुळे संप कालावधीतील वेतन यांना प्रदान करता येणार नाही. परंतु, माहे नोव्हेंबर पेड इन डिसेंबर 2016 व डिसेंबर पेड इन जानेवारी 2017 या महिन्यातील वेतन हे वेतन देयकातून त्यांना संप कालावधीतील वेतन अदा केले आहे. तरी याबाबत खुलासा करावा व याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन दाखवावे.

**4.32 नियमबाह्य प्रतिनियुक्ती व प्रतिनियुक्ती कालावधीत नियमबाह्य जादा दराने घरभाडे भत्ता दिल्याने रक्कम अतिप्रदान झाल्याबाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, कागल येथील आस्थापनेवर नियुक्त असलेले काही कर्मचारी प्रतिनियुक्तीने जिल्हा परिषद कोल्हापूर येथे कार्यरत असून त्यांना मूळ आस्थापनेवरील दहा टक्के दराने घरभाडे भत्ता देय असताना वीस टक्के दराने दराने घरभाडे भत्ता अदा केल्याने रक्कम अतिप्रदान झाल्याचे दिसून आले. सदर अनियमिततेबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कागल येथील आस्थापनेवर नियुक्त असलेले खालील कर्मचारी प्रतिनियुक्तीने जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे कार्यरत असून त्यांना मूळ आस्थापनेवरील (कागल) दहा टक्के दराने घरभाडे भत्ता देय असताना वीस टक्के दराने वेतनातून घरभाडे भत्ता अदा केल्याने एकूण अतिपप्रदान रक्कम रूपये 1,58,062/- वसूल होणे आवश्यक आहे.

2) मुख्य कार्यकरी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे आदेश क्रमांक कोजिप/साप्रवी/कवि 13/घरभाडे/ 2015, दिनांक 28/10/2015 अन्वये श्री.गावडे यांना जिल्हा परिषद मुख्यालयास लागू असलेल्या वीस टक्के दराने घरभाडे भत्ता देण्यास मंजुरी दिली आहे. सदर मंजुरी कोणत्या नियमाने दिली? याबाबतचे प्राधिकार सादर केलेले नाहीत. सबब याबाबतीत शासन निधीचे नुकसान होत असल्याने ही बाब लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियमानुसार सहा महिन्यापर्यंत प्रतिनियुक्ती देण्याचे अधिकार आहेत सहा महिन्यावरील कालावधीस विभागीय आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. अशी मंजुरी घेण्यात आलेली नसून नियमबाह्यपणे प्रतिनियुक्ती चालू ठेवल्याने वेतन व भत्त्येवर झालेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

**4.33 शासकीय निवास्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमबाहय घरभाडे भत्ता अदा केल्याने शासन निधीची हानी झाल्याबाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, कागल सन 2016-2017 या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समितीकडील मालमत्ता नोंदवही नमुना नंबर 39 ची तपासणी केली असता, शासकीय निवास्थान कर्मचाऱ्याच्या ताब्यात असताना नियमबाहय घरभाडे भत्ता अदा केल्याने शासन निधीची हानी झाल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीकडील मालमत्ता नोंदवही नमुना नंबर 39 ची तपासणी केली असता, खालील पंचायत समिती आवारात 08 शासकीय कर्मचारी शासकीय निवास्थाने असून त्यातील 04 निवास्थाने वापराविना पडून असल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता, सदर निवास्थाने वापरास अयोग्य असल्याचे सांगण्यात आले. परंतु, सदर निवासस्थाने वापर अयोग्य असल्याबाबत बांधकाम विभागाकडील दाखला घेण्यात आलेला नाही.

2) निवास क्रमांक 1 हे श्री.साईप्रसाद अशोक कांबळे परिचर यांच्या ताब्यात असून ते प्राथमिक आरोग्य केंद्र, कसबा सांगाव येथे कार्यरत आहेत. श्री.कांबळे हे माहे 2013 पासून शासकीय निवासात राहत असल्याने नियमानुसार त्यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता त्यांना अनुज्ञेय नसताना तो नियमबाहय आहारीत केलेला असून त्यांच्याकडून तो रोखीने वसूल करून जिल्हा परिषद स्वनिधी खाते क्रमांक 4 मध्ये चलनाने भरणा केला आहे. वास्तविक घरभाड्यापोटी जमा होणारे उत्पन्न शासन निधीचा भाग असल्याने सदर रक्कम जिल्हा परिषद स्वनिधीत नियमबाहयपणे माहे जुलै 2017 अखेर रक्कम रूपये 99,042/- जमा केली आहे. त्यामुळे सदर रक्कम जिल्हा परिषद स्वनिधीतून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. तसेच माहे ऑगस्ट 2017 पासून त्यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता अदा करणे बंद करणे आवश्यक आहे.

3) त्याचप्रमाणे शासकीय निवास क्रमांक 5 हे श्री.आर.पी.डोईफोडे कनिष्ठ सहायक यांच्या ताब्यात असून ते माहे जुलै 2014 पासून बदलीने ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद येथे कार्यरत आहेत ते शासकीय निवासात राहत असल्याने नियमानुसार त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसताना तो ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद यांनी 20 टक्के दराने वेतन देयकातून नियमबाहय आहारीत करून अदा केलेला आहे. वीस टक्के आहारीत घरभाडे भत्त्यापैकी दहा टक्के घरभाडे रक्कम त्यांनी रोखीने जिल्हा परिषद स्वनिधी खाते क्रमांक 4 मध्ये चलनाने भरणा केला आहे. श्री. डोईफोडे हे शासकीय निवासात राहत असल्याने त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. त्यामुळे त्यांना नियमबाहय अदा घरभाडे रक्कम रूपये 81,438/- वसूल होणे आवश्यक आहे. सबब श्री.डोईफोडे यांनी जिल्हा निधीत प्रती महा रूपये 1,562/- प्रमाणे 38 महिने करिता चलनाने भरणा रक्कम रूपये 59,356/- जिल्हा निधीतून शासन खाती व उर्वरित त्यांना लाभ मिळालेली रक्कम रूपये 22,082/- त्यांच्याकडून वसूल करून अशी एकूण रक्कम रूपये 81,438/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे व माहे ऑगस्ट 2017 पासून त्यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता अदा करणे बंद करणे आवश्यक आहे.

**4.34 ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणातील प्रलंबित वसुलीबाबत**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, बार्शी सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात ग्रामपंचायत विभाग तपासणी वेळी तालुक्यातील अफरातफर झालेल्या ग्रामपंचायतींची माहिति पाहिली असता एकूण 4 ग्रामपंचायतमध्ये अफरातफर झालेली असून वसूलीची पडताळणी केली असता रक्कम रूपये 8,56,250/- एवढी दिनांक 31/03/2017 अखेर थकबाकी येणे शिल्लक दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 07 ग्रामपंचायतीमधील अपहारीत रक्कम रूपये 14,75,395/- पैकी रक्कम रूपये 6,19,145/- वसूल झालेले असून रक्कम रूपये 8,56,250/- वसुलात आणणे बाकी असून सदर वसुलीची टक्केवारी नगण्य आहे. तसेच वसुलीबाबत पंचायत समितीने प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत यावरून पंचायत समितीची उदासीनता दिसून येते. तरी विशेष वसुली मोहीम राबवून प्रलंबित अपहारीत रक्कम रूपये 8,56,250/- वसुलात आणून लेखापरीक्षणास दर्शवावे.

**4.35 नैसगीक आपत्ती टंचाईग्रस्तं गावात टॅंकरने पाणीपुरवठा करण्यासाठी अधिग्रहित टॅंकरचे इंधन व वंगण तसेच दुरूस्ती खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती चिखलदरा, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** अधिग्रहित टॅंकरचे इंधन व वंगण तसेच दुरुस्तीवर एकुण रूपये 26,97,094/- खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टंचाईग्रस्तं भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ टॅंकरने पाणीपुरवठा करण्यासाठी अधिग्रहीत टॅंकर उपलब्धं झाल्यापासुन टॅंकरमध्ये भरणा केलेल्या इंधन व वंगण यांची पंचायत समिती स्तरावर टॅंकरनिहाय नोंदवही ठेवण्यात आले नाही. इंधन व वंगन इत्यादी नोंदी लॉगबुक मध्ये घेण्यात आले.

2) टॅंकरमध्ये इंधन व वंगणाची भरणा मे. ओसवल ऑटोमोबाईल, अचलपूर येथुन केले असून इंधन व वंगाणाची भरणाबाबत पंचायत समिती कुपन / पासेस देणे आवश्यंक हाते. परंतु कुपन / पासेस देण्यात आल्या नाहीत.

3) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेशातील अटी व शर्ती नुसार तलाठी व ग्रामसेवक यांनी गावपातळीवर अधिग्रहित केलेल्या वाहनांनी केलेल्या ट्रिप व केलेला पाणीपुरवठा यांच्याबाबत नोंदवही ठेवणे आवश्यंक आहेत. तशी नोंदवही आढ्ळून आली नाही.

4) अधिग्रहित वाहन दुरुस्तीसाठी खरेदी केलेले सुटे भाग व दुरुस्तीवर एकुण रुपये 3,94,037/- खर्च केले असुन त्यांची एकत्रित नोंदी बिलाचे संक्षिप्त तपशिलासह इतिहास पुस्तिकेत आहे. परंतु, वाहनानिहाय इतिहास पुस्तिकेत नोंदी घेतलेल्या नाहीत.

5) वाहनावर दुरुस्तीसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यापुर्वी यत्रिकी विभाकडून तांत्रिक सल्ला घेणे आवश्यक होते. परंतू, वाहन चालकाने दिलेल्या अर्जानुसार खाजगी गॅरेजमधुन दुरुस्ती केली आहे याबाबत वित्तीय नियमांचे पालन करण्यात आले नाही. सुटे भाग खरेदीबाबत व दुरुस्तीबाबतचे दर मंजुर केले नाहीत त्यामुळे दर वाजवी असल्याबाबत पडताळणी करता आले नाही. दुरुस्ती खर्च वगळता दोन वाहनवावरील सुटे भाग खरेदीवर प्रत्येकी रूपये 50,000/- पेक्षा जादा खर्च केले असून एकंदरीत दहा वाहनवारील सुटे भाग खरेदीवर रुपये 3,41,347/- खर्च केले आहेत. कोणत्याही तांत्रिक अधिका-याच्या मंजुरीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात केलेल्या खर्चाची चौकशी करुन जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक आहे.

6) वाहन क्रमांक एम टी व्ही 3528 चे अधिग्रहित आदेश उपलब्ध केले नाही.

7) आयकर अधिनियमाअंतर्गत देयकातुन 2 टक्के आयकर व त्यावर 12 टक्के सरचार्ज तसेच मुल्यंवर्धित कर अधिनियमांतर्गत 2 टक्के विक्रिकर वसुल करणे आवश्यक आहे. मे. ओसवाल ऑटोमोबाईल यांस रूपये 23,03,057/-. युनिक मोटर्स परतवाडा यांना रुपये 1,09,878/- व पुजा मोटर्स, परतवाडा यांना रुपये 2,31,469/- असे प्रदान केले आहेत. सबब युनिक मोटर्सकडुन रुपये 4,726/-, पुजा मोटर्स, परतवाडा कडुन रुपये 9,952/- असे रुपये 14,678/- वसुल करुन अनुपालपासह पुर्तता करावी

8) वाहन दुरूस्तीबाबत नोंदी संबंधित विभागाने वाहनाचे इतिहास पुस्तंकात घेणे आवश्यंक आहेत नोंदी घेवुन अनुपालनसह पुर्तता करावी

**4.36 90 टक्के अनुदानावर पंचायत समिती सेस फंडातून समाजकल्याण योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीय महीलांना शिलाई मशीन वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** ग्रामीण भागातील मागासवर्गीय महीलांना 90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणे या योजनेवर रककम रूपये 2,97,000/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र. 9/ वित्त 9, दिनांक 19/05/2016 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनेचे काटेकोरपणे नियोजन करणे तसेच सदर निधी नियमानुसार व निकषानुसार खर्च करणे व वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी प्राप्त झालेला निधी विहीत निकषानुसार व विहीत कालमर्यादेमध्ये खर्च होईल व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळेल, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची

असतांना विभागाने शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी न केल्याने योजनेचा उददेश सफल झाला नसल्याचे दिसते.

2) सदर योजनेच्या नस्तीची तपासणी केली असता सदर नस्तीवर कोठेही दिनांक नमूद करण्यात आलेली नाही.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीच्या आदेशावर पत्र क्रमांक व दिनांक नमूद नाहीत.

4) लाभार्थी निवड ही पंचायत समिती मासिक सभा दिनांक 17/12/2016 ठराव क्रमांक 8/3 अन्वये करण्यात आली असल्याचे नमूद आहे. मात्र सदर ठरावात संबंधीत लाभार्थ्यांची नावे नमूद नाहीत. त्यामुळे योग्य लाभार्थ्यांची निवड होवून गरजू लाभार्थ्यांस लाभ दिला गेल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीआरसी-1089/प्र.क्र.55, दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

6) सदर योजनेअंतर्गत अनुदानाचे प्रदान हे DBT योजनेअंतर्गत 1) ADCC बॅक अचलपुर मधे चेक क्रमांक 3,99,752 दवारे रुपये 2,97,000/- जमा करण्यात आलेले आहेत. पण, लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सदर धनादेश रोखपुस्तकानुसार अरोखीकृत आहे यावरुन सदर योजनेचा निधी 31 मार्चपुर्वी खर्च करण्याचा उददेश सफल झाला नाही. खुलासा करावा.

7) सदर लाभार्थ्यांचे अर्जाची पडताळणी केली असता लाभार्थ्यांचे अर्जासोबत करारनामे नाहीत. तसेच एकूण लाभ देण्यात आलेल्या 66 लाभार्थ्यांपैकी एकूण 24 लाभार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे अर्ज व कागदपत्रे दप्तरी उपलब्ध नसतांना अनुदाच्या रक्कमेचा लाभ देण्यात आलेला आहे.

8) श्रीम.रेश्मा नेवारे रा. चमक खु. यांचे शिलाई मशिन खरेदीचे देयक रुपये 4,000/- चे असतांना त्यांना रुपये 4,500/- एवढया अनुदानाचा लाभ देण्यात आलेला आहे.

9) लाभार्थ्यांच्या शिलाई मशिन खरेदीचा दिनांक हा माहे एप्रिल 2017 हा असून योजनेचा लाभ हा दिनांक 31/03/2017 पर्यंत देणे आवश्यक असतांना योजनेचा लाभ सन 2017-2018 या वित्तीय वर्षात देण्यात आल्याचे दिसते.

**4.37 पंचायत समीती सेस फंडामधून 10 टक्के महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील शाळा शिकणा-या मुलींना लेडीज सायकल पुरविणे व 3 टक्के अपंगांना साहित्य पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** 10 टक्के महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील शाळा शिकणा-या मुलींना लेडीज सायकल पुरविणे व 3 टक्के अपंगांना साहित्य पुरविणे या योजनेवर रक्कम रूपये 1,73,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2016/प्र.क्र. 9/ वित्त 9, दिनांक 19/05/2016 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजनेचे काटेकोरपणे नियोजन करणे तसेच सदर निधी नियमानुसार व निकषानुसार खर्च करणे व वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी प्राप्त झालेला निधी विहीत निकषानुसार व विहीत कालमर्यादेमधे खर्च होईल व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना वेळेत मिळेल, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची असतांना विभागाने शासन निर्णयाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी न केल्याने योजनेचा उददेश सफल झाला नसल्याचे दिसते.

2) सदर योजनेच्या नस्तीची तपासणी केली असता सदर नस्तीवर कोठेही दिनांक नमूद करण्यात आलेली नाही.

3) सदर योजनेच्या प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीच्या आदेशावर पत्र क्रमांक व दिनांक नमूद नाहीत.

4) लाभार्थी निवड ही पंचायत समिती मासिक सभा दिनांक 10/02/2017 ठराव क्रमांक 4 अन्वये करण्यात आली असल्याचे नमूद आहे. मात्र सदर ठरावात संबंधीत लाभार्थ्यांची नावे नमूद नाहीत. त्यामुळे योग्य लाभार्थ्यांची निवड होवून गरजू लाभार्थ्यांस लाभ दिला गेल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पीआरसी-1089/प्र.क्र.55/

दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

6) सदर योजनेअंतर्गत अनुदानाचे प्रदान हे धनादेश क्रमांक 399753 नुसार रुपये 49,500/- व धनादेश क्रमांक 399754 नुसार रुपये 1,24,000/- प्रदान करण्यात आलेले आहेत. पण लेखापरिक्षण कालावधीपर्यंत सदर धनादेश रोखपुस्तकानुसार अरोखीकृत आहेत यावरुन सदर योजनेचा निधी 31 मार्चपुर्वी खर्च करण्याचा उददेश सफल झाला नाही. खुलासा करावा.

7) वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना लाभार्थ्यांकडून /कुटुंबप्रमुखाकडून सदर वित्तीय वर्षातील मालमत्ता कर भरणा पावती प्राप्त केल्या असत्या तर त्या ग्रामपंचायतीचे आर्थिक उत्पन्न वाढले असते. मात्र तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) 3 टक्के अपंग लाभार्थ्यांचे अर्ज लेखापरिक्षणात तपासणीसाठी आढळून आले नाहीत. पुर्तता दर्शवावी.

**4.38 आदिवासी दुर्गम डोंगराळ भागात काम करणाऱ्या कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता प्रदानाबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 41) -** आदिवासी दुर्गम डोंगराळ भागात काम करणाऱ्या कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता रककम रूपये 22,974/- अदा केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक आस्था/170/प्र.क्र.114/भा 3/का-15, दिनांक 09/11/2005 अन्वये आदिवासी विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाच्या पाचव्या वेतन आयोगानुसार 15 टक्के कमाल मर्यादेच्या रुपये 1,500/- प्रोत्साहन भत्ता लागु आहे. परंतु, 6 वेतन आयोगानुसार तरतुद नाही.

2) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टिएसपी/1086/8710/प्र.क्र.31/का 5, दिनांक 09/03/1990 नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्र महाराष्ट्र राज्य असाधारण अधिसुचना दिनांक 02/12/1985 भाग खंड 3 उपखंड -1 क्रमाक 521 द्वारे महाराष्ट्रातील अनुसुचित क्षेत्र घोषीत केले त्यात धारणी व चिखलदरा (Sheduled Arear 1985Main TSP) 148 व 196 (1) आदिवासी क्षेत्र समजावे. असे असतांना अचलपूरमधील गावे कशी आदिवासी क्षेत्रात मोडतात, याबाबत खुलासा करावा.

3) अनुक्रमांक 1 नुसार पाचवे वेतन आयोगानुसार 15 टक्के अनुज्ञेय म्हटले आहे तर 6 वेतन मुळवेतनावर कसा दिला? खुलासा करावा.

4) वर दिल्याप्रमाणे तसेच इतर विभागातील कर्मचा-यांना दिलेला लाभाबाबत तसेच पंचायत समिती स्तरावरील ज्या कर्मचा-यांना सदर लाभ दिला असेल, त्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

**4.39 मंजूर पदे नसतांना वेतन व भत्यावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत.**

**पंचायत समिती चांदूर बाजार, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, चांदुर बाजार अंतर्गत शिक्षण विभागाचे पगार देयकाची पडताळणी केली असता, असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, घाटलाडकी या शाळेवर श्री. शेख इसराईल शे महेबुब या शिपायाचे पद दर्शवून वेतन व भत्ते काढण्यात येत आहे. सदरचे पद हे मंजूर कृती आराखडयात समाविष्ट असल्याबाबतची कोणतेही अधीकृत अभीलेखे विभागाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे संबंधीतांचे वेतन व भत्यावर

रक्कमा कशाच्या आधारे खर्ची टाकत आहे, याबाबत पडताळणी करता आली नाही. सदरची पदे ही जर प्रत्यक्षात मंजूर नसल्यास त्यांचे वेतन व भत्यावर झालेल्या खर्चाबाबतची जबाबदारी निश्चित होणे क्रम:प्राप्त ठरते.

**4.40 CCTV खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** CCTV खरेदीकरिता रक्कम रूपये 1,81,145/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त नमूद अनुक्रमांक 1 ते 4 वर नमूद साहित्याची खरेदी करतांना राबवायची प्रक्रिया पार पाडतांना पंचायत समितीने सदर खरेदीकरीता कार्यवाही केलेली आहे. सदर कार्यवाहीचा क्रम बघता खरेदी करण्याची प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांचे प्रशासकीय मान्यता तथा शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव होण्यापूर्वीच घेतलेला दिसून येतो.

2) CCTV कॅमेरा सर्किट संच खरेदी प्रकरणी शाळेद्वारा दिनांक 31/03/2017 या एकाच दिवशी सर्व प्रक्रिया पार पाडण्यात आली. सदर प्रक्रियेमध्ये (i) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची प्रशासकीय मान्यता तथा दरास मंजूरी घेणेबाबत टिपणी दिनांक 31/03/2017 (ii) पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे यांना आदेश क्रमांक 140 अन्वये पूरवठा करणेबाबत पत्र दिनांक 31/03/2017 (iii) पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे यांनी पूरवठा केल्याबाबत सादर केलेले प्रमाणक दिनांक 31/03/2017 (iv) पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे यांना पूरवठा केल्याबाबत रक्कम प्रदान दिनांक 31/03/2017.

3) CCTV कॅमेरा सर्किट संच खरेदीला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची दोनवेळा प्रशासकीय मान्यता आहे. प्रथम मान्यता आदेश क्रमांक 3189, दिनांक 31/03/2017 रोजीचे असून दुसरी मान्यता पत्र क्रमांक 4107, दिनांक 04/05/2017 रोजीची आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रत्यक्षात CCTV कॅमेरा सर्किट संचाची खरेदी माहे मे 2017 या महिन्यात करण्यात आली. तथापि, खरेदी प्रक्रिया सन 2016-2017 या आर्थिक वर्षात दाखविण्यात आली.

4) CCTV कॅमेरा सर्किट संच खरेदी प्रक्रियेत पीयस टेक सोल्युशन, अमरावती या पूरवठादाराची निविदा प्राप्त होऊन सदर पूरवठादाराची निविदा मंजूर करण्यात आल्यानंतर पूरवठा आदेश पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे या नांवाने देण्यात येऊन पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे याच नावाने रक्कम सूध्दा प्रदान करण्यात आली. निविदा पीयस टेक सोल्युशन, अमरावती या नावाने मंजूर झाल्यावर पीयस टेक सोल्युशन, चांदूर रेल्वे यांना पूरवठा आदेश व रक्कम प्रदान करण्यामागचे प्रयोजन काय? त्यामुळे करण्यात आलेली खरेदी आक्षेपार्ह असून नियमबाहयपणे करण्यात आली आहे.

5) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.83/भाग-III/उदयोग-4, दिनांक 01/12/2016 किमतीचा आधार - नियम क्रमांक 3.1.2.2 मधील मुददा क्रमांक 4 नुसार बाजारपेठेचे सर्वेक्षण करुन साहित्याच्या किंमतीत असलेला फरक लक्षात घेऊन खरेदीस प्राधान्य दयावयाचे आहे. तथापि, अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्याने CCTV कॅमेरा सर्किट संच खरेदी करतांना देयकामध्ये नमूद करण्यात आलेल्या कॅमेरा, डोम, हार्ड डिस्क इ. वर्णणाच्या (Specification) साहित्याची किंमतीत तफावत आढळून येते. सदर CCTV खरेदीच्या एकुण रक्कम रुपये 1,04,641/- पैकी कॅमेरा, डोम, हार्ड डिस्क इ. बाबीवर रुपये 68,000/- एवढा खर्च नमूद असून उर्वरित खर्च केबल, इ.वर करण्यात आला आहे. शाळेद्वारा Hikvision या कंपनीचे CCTV कॅमेरा सर्किट संच लावण्यात आले आहे. सदर संचातील कॅमेरा, डोम, हार्ड डिस्क इ. त्याच वर्णणाच्या (Specification) साहित्याची Hikvision कंपनीच्याच संकेतस्थळावर पडताळणी केली असता दरामध्ये रक्कम रूपये 22,499/- फरक आढळून येतो.

Hikvision कंपनीच्याच संकेतस्थळावर नमूद साहित्याची किंमत ही संपूर्ण करांसहित नमूद केलेली आहे तर पूरवठादाराने प्रमाणकात नमूद केलेल्या विविध साहित्यावर VAT लावून साहित्याचे दर नमूद केले आहे. सदर बाबीवरुन हे आढळते की शाळेद्वारे खरेदी करण्यापूर्वी एकुण दराबाबत बाजारपेठेचे सर्वेक्षण करण्यात न आल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. केवळ अनुदान उपलब्ध आहे या कारणास्तव CCTV कॅमेरा सर्किट संच या

साहित्यावर अनावश्यक खर्च करण्यात आल्याचे स्पष्ट होऊन खरेदी प्रक्रिया ही शासन निर्णयाचे उल्लंघन करुन केली असल्यामुळे CCTV कॅमेरा सर्किट संच या साहित्याच्या देयकाची रक्कम मान्य करता येत नाही.

**4.41 ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती वरूड, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरविणेबाबतच्या योजनेवर रक्कम रूपये 1,84,800/- खर्च केला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, वरुड यांनी शिलाई मशीनकरीता 100 टक्के अनुदानावर एकुण 50 लाभार्थ्यांची निवड केली आहे. ग्रामपंचायत स्तरावरुन अर्ज मागवून त्याची छाननी करून पंचायत समिती स्तरावर ठरावाप्रमाणे अर्ज मंजुर करावयास पाहीजे. महाराष्ट्र शासन व ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड्पीए-2016/प्र.क्र. 9/ वित्त-9, दिनांक 19/05/2016 नुसार योजना राबवितांना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आल्याचे आढळून आले नाही. झालेल्या नियमबाहयतेबाबत खुलासा करावा.

2) लाभार्थ्यांचे अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे पडताळणी करता आली नाही.

3) नियोजन विभागाचे शासन निर्णय क्रमांक डिसीटी 2316/प्र.क्र.133/का1417, दिनांक 05/12/2016 नुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

4) पंचायत समितीने यासाठी वरील प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,84,800/- आहरीत करुन त्याची धनादेशनिहाय बँकनिहाय विवरणे तयार करण्यात आलेले असुन सर्व धनादेश असंवितरीत आहेत.

5) सदर योजनेचा कालावधी दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 असतांना वर नमुद केल्याप्रमाणे रितसर प्रक्रिया केलेली असतांना लेखापरिक्षण कालावधीपर्यंत वर नमुद केलेले धनादेश लेखाविभागात पडून असल्याचे दिसुन आले. त्यामुळे प्रत्यक्ष योजना न राबवताच केवळ खर्च दर्शविल्याचे दिसुन येते. त्यामुळे योजनेचा उद्देश सफ़ल झाला नसुन लाभार्थी प्रत्यक्ष लाभापासुन वंचीत राहीले आहेत.

**4.42 रुणमोचन यात्रा व्यवस्थान खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भातकुली, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ऋणमोचन यात्रा परिसरातील पाईप लाईन दुरुस्ती व स्टॅन्डपोस्ट दुरुस्ती व तयार करणेकरीता 3 मजुर दिनांक 04/01/2017 ते 09/01/2017 पर्यंत नमूना नंबर 22 वर दर्शविले आहे. परंतु, अनुक्रमांक 3 चा मजुर श्री. संजय बाळु झामरे यांना रककम मिळालेबाबत नमूना नंबर 22 वर सही नाही. सदर मजुर हा 6 दिवस दर रूपये 300/- प्रमाणे एकूण रुपये 1,800/- वसुल पात्र ठरते.

2) अनुक्रमांक 3 चे खर्च प्रमाणक रुपये 2,360/- धनंजय सिमेंट डेपो मेन रोड, भातकुली यांचेकडुन 8 बॅग सिमेंट दर रूपये 290/- प्रमाणे खरेदी केली आहे. परंतु, सिमेंट कोठे व केव्हा वापर केला, याबाबत मजुरी, रेती व गीट्टी इतर साहित्य नसल्यामुळे सिमेंट खरेदी न करता खर्च नोंदविला आहे. तरी सदर रक्कम रुपये 2,360/- वसुल पात्र ठरते.

3) बील क्रमांक 1,276 दिनांक 03/01/2017 अन्वये रुपये 6,968/- विघुत साहित्य उदा. हॉलेजन 500 वॅट 5 नग, सी.एफ़.एल. 27 वॅट 8 नग व इतर साहित्य खरेदी केली आहे. जयंत इलेक्टीकल्स, अमरावती परंतु, सदर साहित्य कोठे व केव्हा लावण्यात आले, याबाबत मंजुरी नाही. तसेच साठा रजिस्टर लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही. सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

4) बील क्रमांक 281 दिनांक 05/01/2017 रुपये 6,390/- अन्वये कोकाटे ईरीगेशनकडुन पी.व्ही.सी. पाईप 2.5 इंची 8 नग दर 360 प्रमाणे पी.व्ही.सी. टी 2.5 इंची 4 नग दर रुपये 70 प्रमाणे पी.व्ही.सी. पाईप पाऊण इंची

5 नग दर 260 प्रमाणे व इतर साहित्य खरेदी केली आहे. परंतु, हे सर्व साहित्य कोठे व केव्हा उपयोगात आणले व त्याची मजुरी नाली खोदकाम करणे व बुजविणेबाबत मजुरी नाही तरी सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

5) दिनांक 08/01/2017 ला अ. अजिज यांचेकडुन मुरुम 2 ट्रॅक्टर दर रूपये 2,500/- प्रमाणे खरेदी केल्याचे दर्शविले आहे. परंतु, साठा रजिस्टर ठेवले नाही. तसेच तो मुरुम कोठे व केव्हा टाकण्यात आला, याबाबत मजुरी नाही. तसेच मुरुमाची 2 टॅक्टर दर टॅक्टर रुपये 400/- प्रमाणे रुपये 800/- रुपयेची रॉयल्टी भरणा केला नाही. यावरुन मुरुम खरेदी न करता खरेदी केल्याचे दर्शविले आहे. तरी सदर रक्कम वसुल पात्र ठरते.

6) धनंजय सिमेंट डेपो यांचेकडुन यात्रेकरीता दिनांक 22/01/2017 ला 2 ट्रॅक्टर आणि दिनांक 03/02/2017 ला 2 ट्रॅक्टर पाणी खरेदी केली आहे. प्रती ट्रॅक्टर रूपये 4,200/- प्रमाणे एकूण खर्च रुपये 16,800/- खर्च टाकला आहे. व्यावसायीक दृष्टीकोनातुन सदर खर्चाबाबत निविदा मागविल्या असत्या तर, प्रती ट्रॅक्टर बाजार भावानुसार रुपये 600 ते 700 असुन सदर खर्च प्रती ट्रॅक्टर रुपये 4,200/- प्रमाणे कसा लावण्यात आला, याबाबत खुलासा करावा. अन्यथा प्रती ट्रॅक्टर रुपये 3,400/- प्रमाणे 4 ट्रॅक्टरचे रुपये 13,600/- रुपये वसुल पात्र ठरते.

7) ऋणमोचन यात्रा खर्च सन 2016-2017 ची नस्ती निविदा सहित संबधित कर्मचारी यांनी लेखापरिक्षणास सादर केली नाही. तसेच साठा रजिस्टर ठेवण्यात आले नाही, असे तोंडी सांगितले आहे.

8) दिनांक 15/01/2017 ला 5 एकर शेतातील प-हाटी रोटरने काढणेबाबत प्रती एक्कर रूपये 800/- प्रमाणे रूपये 4,000/- खर्च नोंदविला आहे. रोटरने 5 एकरात काम केल्यानंतर दिनांक 23/12/2016 ला दिनांक 10/12/2016 ते 23/12/2016 पर्यंत 4 मजुर दर रुपये 200/- प्रमाणे यात्रा जागा साफसफाई करीता रुपये 11,200/- खर्च दर्शविले आहे. प-हाटीवर रोटर फिरविल्यानंतर बारीक तुकडे होउन जमिनीत पुरविल्या जात असतांना वरील मजुरांनी त्या शेतात काय काम केले, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. अन्यथा साफसफाईवर केलेला खर्च रुपये 11,200/- वसुल पात्र ठरतो.

**4.43 बाजार हर्रास अनियमितेबाबत.**

**पंचायत समिती तिवसा, जिल्हा अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्रमांक 11017 दिनांक 31/12/2016 अन्वये सन 2017-2018 करीता दिनांक 01/02/2017 ते 14/02/2017 या कालावधीत आठवडी बाजार हर्रास करुन रक्कम रूपये 4,20,950/- जिल्हा निधीत जमा करावयाच्या होत्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी यांनी ठरविलेल्या दिनांकास हर्रास न करता नंतरच्या तारखेत हर्रास करण्यात आला आहे. हर्रास विलंबाबाबत क्षमापन प्रस्ताव सादर केल्याचे आढळून आले नाही.

2) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे सुधारीत कायदा 19 अन्वये रूपये 100/- च्या स्टॅम्पपेपर हर्रासाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर करारपत्र करुन गट विकास अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर करणेबाबत सुचना असतांना अनुक्रमांक 1, 4 व 5 चे संदर्भात साक्षीदार व गट विकास अधिकारी यांची करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

3) सदर हर्रासाच्या रक्कमेच्या 25 टक्के रक्कम अनामत रक्कम धनाकर्षाव्दारे स्विकारणेबाबत निर्देशित असतांना ती रोख स्वरूपात घेण्यात आली आहे.

4) बाजार कर व फी वसुली नियम 1991 मधील नियम 8 ब अन्वये बाजार कर वसुली पावती पुस्तके जिल्हा परिषदेने समिती स्तरावर वितरीत केली किंवा कसे, याबाबत तसेच ठेकेदाराने फी वसुली कोणत्या दराने केली, याबाबतचा तपशिल अभिलेख्यात आढळून आला नाही.

**4.44 ग्रामीण भागातील वर्ग 5 ते 12 वा पास/उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी सायकल खरेदी.**

**पंचायत समिती अकोला, जिल्हा अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,93,382/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 3 लक्ष व त्यावरील रक्कमेकरीता खरेदीस ई - निवीदा बंधनकारक आहे. परंतु, सदर योजनेकरीता रुपये 3 लक्ष निधी प्राप्त असतांना

हयामधून रुपये 5,000/- झेरॉक्स खर्च दर्शवुन उर्वेरीत रुपये 2.95 लक्ष निधी योजनेकरीता खर्ची असल्याचे दर्शविले. हयावरुन असे निर्दशनास येते की, ई - निवीदा टाळुन कोटेशन कार्यवाही केलेली आहे. हयाबाबत खुलासा करावा.

2) पंचायत समिती, अकोला यांचे निवीदा सुचना जा.क्रं.पंचायत/पं.स./1935/16, दिनांक 06/10/2016 नुसार दरपत्रक सुचना प्रकाशीत केली व दरपत्रके स्विकारण्याची मुदत दिनांक 14/10/2016 दुपारी 2.00 वाजेपर्यत होती. परंतु, दरपत्रक सुचना अधिकृत संकेत्त स्थळावर प्रकाशीत केली नाही तथा स्थानिक स्वरुपातील अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक हयांना लेखी सुचना पत्र देउन सिल बंद दर मागविले नाहीत. फक्त सुचना प्रसिध्दीस दिल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदर नियमाबाहयतेबाबत खुलासा करावा.

3) प्रसिध्द सुचनेनुसार मे. लक्ष्मी सायकल अकोला, मे. खान सायकल अकोला तथा Aspire Cycle Akola हयांचेकडून निवीदा प्राप्त असल्याचे दिसुन आले. परंतु, अधिकृत विक्रेंता / पुरवठाधारक बाबत तपासणी केली असता Aspire Cycle Akola यांचे नोंदणी प्रमाणपत्रावर Aspire Aqua Industries असे नमुद आहे. त्यामुळे सदरचा निविदाधारक हा सायकल पुरवठा करणे करण्याकरीता अधिकृत कसा काय, याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत असुन निवीदाधारक अधिकृत नसुन निवीदेकरीता पात्र नसल्याचे मत होत आहे तथा खान सायकल हयांचे अधिकृतते बाबत कोणतेच कागदपत्रे नसुन फक्त पॅन कार्ड सोबत जोडले आहे. नमुद बाब लक्षात घेता सदर खरेदी प्रक्रियेकरीता एकच पात्र निवीदाधारक पात्र असतांना खरेदी निवीदा प्रकीया पार पाडलेली आहे. त्यामुळे वरील नमुद शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले असुन सायकल खरेदी करतांना विशिष्ठ निवीदाधारकास एका प्रकारचा लाभ देण्याचा प्रयत्न दिसुन येत आहे. त्यामुळे झालेली खरेदी ही नियमबाहय आहे. याबाबत खुलासा करावा.

4) प्राप्त दरपत्रके ही खरेदी विषयक समिती समोर उघडण्याबाबत कार्यवाही दिसुन येत नसुन याबाबत समिती सुध्दा स्थापन सुध्दा केल्याचे दिसुन येत नाही.

5) सदर खरेदीस सर्वात कमी दर मे. लक्ष्मी सायकल यांचे रुपये 3,498/- असल्याचे दिसुन येत असुन सदर नस्तीवरुन बाजारभावाची शहानीशा तथा वाटाघाटी सुध्दा केल्याचे दिसुन येत नाही.

6) पुरवठा आदेश दिनांक 15/10/2016 नुसार रुपये 100/- चे स्टॅप पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु, या सबंधी कार्यवाही केली नाही.

7) पुरवठा आदेशानुसार पंचायत समिती गोदामापर्यंत आवश्यक सर्व खर्चासह साहित्याचा पुरवठा करणे गरजेचे राहील, असे नमुद आहे. परंतु, प्रत्यक्षात कोणत्या तारखेस तथा कोठे पुरवठा झाला, याबाबत नस्तीमध्ये उल्लेख नाही.

8) स्पेसिफीकेशनप्रमाणे सायकलचा पुरवठा झालेला आहे किंवा कसे, याबाबत तांत्रीक तपासणी / कोणत्याच प्रकारची तपासणी दिसुन येत नाही.

9) साठा नोंदवही वरील नोंदी पुर्णपणे प्रमाणीत नसुन एकुण प्राप्त, वाटप व शिल्लक याबाबत गोषवारे तथा वर्षअखेरची शिल्लक या सर्व बाबी गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

10) सायकल वाटप करतांना सायकल कंपनी, चेचीस क्रंमाक तथा स्पेसिफीकेशनप्रमाणे साहित्य हे सर्व नमुद करुन साक्षीदार घेऊन प्रभारी अधिकारी यांचे समक्ष वाटप करावयाचे होते. परंतु, यासबंधी नमुदप्रमाणे परीपुर्ण कार्यवाही नाही.

11) सायकल वाटपसबंधी पंचायत समितीने काही निकष ठरविले असुन हयामध्ये सबंधीत ग्रामपंचायतीचा ठराव असणे गरजेचे आहे तथा दोन कि.मी. पेक्षा दुर शाळा असणाऱ्या लाभार्थीकरीता मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र, तथा शाळेत शिकत असल्याबाबत प्रमाणपत्र इत्यादी निकष आहेत. या सबंधी काही अंशी लाभार्थीचे प्राप्त अर्ज तपासले असता अर्जामध्ये ग्रामपंचायतीने कोणत्या क्रमांकाचे ठरावाप्रमाणे शिफारस केली, याबाबत उल्लेख नाही. तसेच 2 कि.मी. पेक्षा दुर शाळा असणाऱ्या लाभार्थीकरीता मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र नाही. उदा. कु. निकीता अनंत मोहोड, रा. खडकी तथा शाळेत शिकत असल्याबाबत प्रमाणपत्रामध्ये खोडतोड आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता पंचायत समिती यांनी सायकल वाटपासबंधी ठरविलेले निकषांचे पुर्णपणे पालन झाले किंवा कसे, याबाबत खात्री करुन अप्रात्र लाभार्थीना वाटप असल्यास सबंधीताकडुन रक्कम वसुल करण्याबाबत कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

**4.45 17 सामुहिक विकास अंतर्गत 100 टक्के अनुदानावर ग्रामपंचायतीना लोखंडी ट्री गार्ड पुरविणे खर्चातील अनियमीतता.**

**पंचायत समिती दारव्हा, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** सामुहीक विकास जि.प. सेस अंतर्गत 100 नग लोखंडी ट्रि गार्ड खरेदी करण्यत येऊन ते 4 ग्रामपंचायतीना प्रत्येकी 25 नग याप्रमाणे वाटप करण्यात आले. यावर एकुण रुपये 2,00,000/- एवढा खर्च करण्यात आला असता. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2000/प्रक्र 27/33, दिनांक 05/09/2000 अन्वये रुपये 50,000/- चे वरील खरेदीकरीता व्दिलिफाफा पध्दतीचा अवलंब करावयाचा असतांना अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

2) पंचायत समितीकडुन दिनांक 09/10/2016 रोजी दरपत्रके मागवियात आली. सदर पत्राची कार्यालयीन प्रत सादर करण्यात आले नाही.

3) महाराष्ट्र ट्रेडर्स, जयहिंद फॅब्रीकेशन भारत ट्रेडर्स यांचेकडुन दरपत्रके एकाच लिफाफयात प्राप्त झालेली असुन नोंदणी प्रमाणपत्र नसल्याने सदर पुरवठादार अधिकृत असल्याचे स्पष्ट होत नाही.

5) दरपत्रकात किती कि.ग्रॅ. वजनाचे लोखंडी ट्रि गार्ड असावे, याबाबत कुठेही उल्लेख नाही. साधारणत: लोखंडी वस्तुचा दर हा वजनावर निश्चीत होत असतांना दरपत्रकात पुरवठा आदेशात लोखंडी ट्री गार्डच्या वजनाचा उल्लेख नमुद करण्यात आले नाही.

6) ज्या ग्रामपंचायतीना ट्रि गार्ड पुरविण्यात आले, त्या 4 ग्रामपंचायतीना लोखंडी ट्रि गार्डची आवश्यक असल्याबाबतचे मागणी पत्र नस्तीत उपलब्ध नाही.

7) ग्रामपंचायतीकडील साठापुस्तकांची तपासणी केली असता 25 नग ट्रि गार्ड कुठे, कोणत्या वार्डात व कोणकोणत्या जागेत लावण्यात आले, याबाबतचा उल्लेख कुठेही नमुद नाही.

8) लोखंडी ट्रि गार्ड हे वृक्षरोपाकरीता संरक्षण म्हणुन लावावयाचे असतांना ग्रामपंचायतींनी 25 नग कुठे, कोणत्या जागेत वृक्षारोपण केलीत, याबातची नोंदवही सादर करण्यात आली नाही.

9) डिलीव्हरी मेमो सादर केलेला नाही.

10) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 7 अन्वये साहीत्य योग्य प्रतीचे असल्याबाबतचा चाचणी अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना चाचणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही. त्यामुळे लोखंडी ट्रि गार्ड योग्य प्रतीचे असल्याचे स्पष्ट होत नाही.

**4.46 90 टक्के अनुदानावर टिनपत्रे खरेदी खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती महागाव, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** टिन पत्रे खरेदीकरिता रक्कम रूपये 12,10,503/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थींचे अर्ज आवक करण्यात आले नाही. त्यामुळे लाभार्थींचे अर्ज कोणत्या दिनांकास प्राप्त झाले, याबाबत तपासणी करता आली नाही.

2) कस्तुरी सप्लायर्सकडुन दिनांक 25/11/2016 रोजीची पोहोच पावती सादर करण्यात आली. परंतु, त्या पोहोच पावतीवर गटविकास अधिकारी यांची साहित्य प्राप्तीबाबत दिनांकीत स्वाक्षरी नाही. त्यामुळे साहित्य पंचायत समितीस्तरावर कोणत्या दिनाकांस प्राप्त झाले, याबाबत तपासणी करता आली नाही.

3) निविदा सूचनेमध्ये अट क्रमांक 15 मध्ये साहित्य विहीत मुदतीत न पुरविल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याचे नमुद आहे. परंतु, पुरवठा आदेश कपसम /वंगा/वशी/104/16, दिनांक 17/10/2016 ची तपासणी केली असता त्यांत साहित्य किती दिवसात संबंधीत पुरवठाधारकाने पंचायत समितीस्तरावर पुरवावे याबाबत मुदत नमुद नाही.

4) निविदा सूचनेतील अट क्रमांक 14 नुसार साहीत्याचा पुरवठा झाल्यानंतर त्यातील काही निवडक साहित्याचे नमुने तपासणीकरीता विहीत प्राधीकरणाकडे पाठविण्यात येतील, असे नमुद आहे. परंतु, प्राप्त

साहित्यापैकी कोणतेही रॅनडमली नमुने तपासणी करीत पाठविण्यात आल्याचे कोणतेही दस्ताऐवज नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे मंजुर स्पेसिफीकेशननुसार साहित्य प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

5) निविदा सूचनेतील अट क्रमांक 18 नुसार पुरवठाधारकास देय असलेल्या रक्कमेमधुन आयकराची वसुली करण्याचे नमुद आहे. परंतु, पुरवठा धारकाचे देयकातुन आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रुपये 24,210/- वसुली केले नाही. आयकर रुपये 24,210/- वसुल करुन शासन खाती जमा दर्शवावे.

6) मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे परिशिष्ट ब नुसार प्रथम दहा लाखाकरीता रुपये 100/- व पुढील प्रत्येक एक लाखाकरीता रुपये 100/- याप्रमाणे रूपये 400/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतांना रुपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात आला असल्याचे तपासणीत आढळुन आले.

**4.47 आठवडी बाजार हर्रासीबाबत.**

**पंचायत समिती बुलडाणा, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 46) -** पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत ग्रामपंचायत धाड देऊळघाट व मासरुळ येथील सन 2017-2018 या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रूपये 2,48,000/- बाजार हर्रासी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बाजार हर्रासीच्या 50 टक्के रकमा संबंधीत ग्रामपंचायतीस सहा महीन्यांत वर्ग करणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण दिनांक पावेतो उपरोक्त रकमा ग्रामपंचायतीस वर्ग केल्या नसल्याचे निदर्शनास आले. खुलासा करावा.

2) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बुलढाणा यांनी हर्रासीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर संबंधीत ठेकेदारास वसुली करण्याबाबत लेखी परवानगी दिल्याबाबत कोणतेही दस्तऐवज आढळुन आले नाहीत. खुलासा करावा.

3) शासन निर्णयानुसार तीन वर्षाचे सरासरी रकमे मध्ये 10 टक्के वाढ गृहीत धरून सरकारी किंमत ठरवुन सदर किंमतींच्या वर जास्त रकमेमध्येच हर्रासी करणे बंधनकारक असतांना पंचायत समितीने ग्रामपंचायत धाड बाजार हर्रासीचे वेळी सदर तीन वर्षाचे सरासरी रकमेमध्ये 10 टक्के वाढ गृहीत धरून सरकारी किंमत ठरविण्यात आली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीचे रुपये 8,134/- चे नुकसान झाले आहे. सदर कमी रक्कम संबंधीताकडुन वसुल करुन जिल्हा परिषद सेस निधीत जमा करावी.

4) सदर हर्रासीबाबत गावामध्ये दवंडी दिल्याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास आढळुन आले नाहीत.

5) उपरोक्त तीनही ग्रामपंचायतीच्या बाजार हर्रासीबाबत वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी दिली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दरांचा फायदा झाला नाही. याबाबत खुलासा करावा.

6) बाजार हर्रासीचे अट क्रमांक 6 नुसार ठेकेदारास बुलढाणा जिल्हा परिषदेने ठरवुन दिलेल्या दरानुसार बाजार फी वसुल करणे बंधनकारक असल्याने सदर ठेकेदारास वसुलीकरीता लागणारी पावती पुस्तके त्याने स्वत खर्चाने तयार करुन घेवुन गटविकास अधिकारी पंचायत समिती, बुलढाणाकडून प्रमाणित करुन घेऊन व त्याची नोंदवही ठेवणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही. खुलासा करावा.

7) बाजार फीचे वसुलीचे दराबाबत जनतेच्या माहीतीकरीता फलक लावणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. खुलासा करावा.

**4.48 14 वा वित्त अंतर्गत आराखडा तयार करणे व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये केलेल्या नियमबाहय जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती चिखली, जिल्हा बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** ग्रामपंचायत स्तरावरील प्रशिक्षण देणा-या प्रशिक्षकाचे मानधन रक्कम रूपये 4,49,440/- अदा केले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीडीपी-2015 /प्र क्र 38 / प रा 6, दिनांक 04/11/2015 अन्वये 14 व्या वित्त आयोगाचा निधी मिळविण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ‘आमच गांव आमचा विकास’ या उपक्रमातर्गत ग्रामपंचायत विकास

आराखडा तायार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वरील प्रशिक्षण देण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत स्तरावर 3 दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करुन ग्रामस्तरावरील सर्व कर्मचारी व गावातील लोकांनां प्रविण प्रशिक्षकाकडुन प्रशिक्षण देणे आवश्यक होते. त्यांसाठी उच्च शिक्षित व अनुभवी प्रशिक्षण नियुक्त करुन प्रथम यशदा या प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणे बंधनकारक होते. परंतु, पंचायत समिती चिखली अंतर्गत एकूण 14 प्रशिक्षक निवडेले होते. ते सर्व त्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीचे संगणक ऑपरेटर असुन अशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांना यशदा मार्फत प्रशिक्षण दिल्याबाबत व जिल्हा परीषदेने त्याची प्रविण प्रशिक्षण म्हणुन नामनिर्देशन पदी नियुक्ती केल्याबाबत कोणताच अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी दिलेले प्रशिक्षणाच्या दर्जाबाबत व निधीच्या विनियोगाबाबत खात्री होत नाही. याबाबत योग्या ती चौकशी होणे आवश्यक आहे.

2) तसेच त्यांनी एकुण 14 गणात प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण हे 3 दिवसाचे असुन प्रती पशिक्षण रूपये 4,200/- मानधन ठरविण्यात आले होते. परंतु, 8 कर्मचा-यांना 3 दिवसाच्या प्रशिक्षणाचे रूपये 8,400/- प्रदान करण्यात आले. त्याची वसुली होणे आवश्यक आहे.

संबधीत प्रशिक्षकांना रूपये 33,600/- प्रदान करणे आवश्यक असतांना रूपये 67,200/- प्रदान केले आहे. जादा प्रदान रुपये 33,600/- ची संबधीताकडुन वसुली करुन योग्य लेखाशिर्षाखाली भरुन अनुपालन दर्शवावे.

**4.49 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांना किमान वेतन अनुदान एकुण 55 ग्रामपंचायतीस एप्रिल-2016 ते मार्च-2017 चे 100% व 75% प्रमाणे एकुण रक्कम रुपये 74,39,100/- अदा करुन खर्च रोख पुस्तकाला नमुद करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्ही.पी.एम.2699/प्रक्र 206(2)/21, दिनांक 21/01/2000 प्रमाणे लोकसंख्येचा आधारे मंजूर केलेल्या आकृती बंधानुसार ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांना किमान वेतन दयावयाचे आहे. तथापि, लोकसंख्या विचारात घेतल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-1012/प्र.क्र.235/परा-3, दिनांक 04/03/2014 नुसार 100% व 75% प्रमाणे वाढीव हिश्यास पात्र होण्यासाठी सबंधित ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे फेरआकारणी करणे व गत वर्षात सर्व करांच्या एकुण मागणीची 90% वसुली करणे बंधनकारक राहील. त्यास्तव सन 2016-2017 चे किमान वेतन अनुदान प्रदान करतांना गत वर्षाची सन 2015-2016 ची वसुली ही 90% बंधनकारक असल्याने एकुण 55 ग्रामपंचायतीस किमान वेतन अनुदान प्रदान करतांना त्या-त्या ग्रामपंचायतीची कर वसुली विचारात घेण्यात आली नाही.

3) प्र.क्र.878, दिनांक 31/03/2017 मध्ये रुपये 58,88,700/- किमान वेतन प्रदान एकुण 55 ग्रामपंचायतीस दर्शविले आहे. परंतु, परत प्र.क्र.990, दिनांक 31/03/2017 मध्ये रक्कम रूपये 58,88,700/- मधुन 13 ग्रामपंचायतींचे 15,50,400/- बँकेचे यादया चुकल्या मुळे परत आल्या त्यास्तव पुनःश्च प्रदान प्रदान दर्शविले आहे. यामध्ये सदर प्रदाने हे दिनांक 31/03/2017 मधील असल्याने एकाच तारखेत सदर बँकेत चेक वटविणेचे अगोदरच यादया चुकल्या म्हणुन माहिति होणे व पुनश्च त्याच तारखेत नवीन खर्च घालणे शक्य नाही. या प्रक्रियेत कमीत कमी तीन दिवसाचा कालावधी लागतो. तरी सुध्दा वरीलप्रमाणे एकाच तारखेत खर्च नोंदविल्याने संशयास्पद बाब आढळुन येत आहे.

4) ग्रामपंचायतीने आपले स्वत:चे फंडातुन किमान वेतनावरील संपुर्ण खर्च प्रथम करावयाचा आहे व त्या खर्चाचे अनुषंगाने ग्रामपंचायतीने अनुदानासाठी प्रतीपूर्ती म्हणुन 100% व 75% अनुदानाची मागणी करावयाची आहे.

परंतु, सदर अनुदान प्रदान करणेची प्रक्रिया शासन नियमाप्रमाणे झालेली नाही. ग्रामपंचायतीची मागणी नसतानाही एकमुस्त सरसकट अनुदान प्रदान करण्यात आले आहे.

5) प्र.क्र.990दिनांक 31/03/2017 मध्ये रक्कम रूपये 58,88,700/- मधुन 13 ग्रामपंचायतीचे 15,50,400/- बँकेचे यादया चुकल्यामुळे परत आल्या. त्यास्तव पुनःश्च प्रदान प्रदान दर्शविले आहे. परंतु, सदर खर्चाचे अनुषंगाने कोणत्या ग्रामपंचायतीचे यादया चुकल्या? ते नमुद नाही.

6) ग्रामपंचायतीने किमान वेतन स्वत:चे फंडातुन प्रदान केले म्हणुन त्यास्तव ग्रामपंचायतीने नोकर पगार नमुना-24 मधिल रजिस्टराचे प्रमाणके पंचायत समितीला सादर केलेले नाही. ग्रामपंचायत सचिव यांनी तशी कर्मचारी किमान वेतन अनुदान मागणीचे पत्र सुध्दा पंचायत समितीला दिले नाही.

**4.50 मुद्रांक शुल्क अनुदान ग्रामपंचायतींना वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समितीचे सन सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात उपरेक्त प्रमाणकांची तपासणी केली असता एकुण 63 ग्रामपंचायतीला 50 टक्के मुद्रांक अनुदान प्रमाणक क्रमांक 175 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 13,17,314/- वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत विभागानी मुद्रांक शुल्क अनुदान वरील प्रमाणकाव्दारे रक्कम एकुण रुपये 13,17,314/- पैकी रक्कम रूपये 1,24,465/- एकुण 63 ग्रामपंचायतीला वाटप केलेली आहे. परंतू, सदर ग्रामपंचायतीकडून नमुना 7 ची पावती घेणे आवश्यक असतांना विभागानी तसा प्रकारची कार्यवाही केलेली नाही. वरील ग्रामपंचायतीकडून नमुना 7 ची पावती घेवून अनुपालन सादर करावे.

2) ग्रामपचांयतीतील वाटप करण्यात आलेली मुद्रांक शुल्क अनुदान रक्कमेचा विनियोग शासन निर्देशाप्रमाणे करण्यात आला किंवा नाही, याबाबतचा अहवाल पंचायत समितीने ग्रामपंचायतीकडून घेतलेला नाही.

3) एकुण मुद्रांक शुल्क अनुदान रूपये 13,17,314/- पैकी रक्कम रूपये 8,38,878/- हातपंप वर्गणी रूपये 2,57,543/- जिल्हा ग्रामविकास निधी कर्ज कपात व रक्कम रूपये 96]428/- जिल्हा ग्रामविकास निधीची कपात केली आहे. हातपंप वर्गणी व जिल्हा ग्रामविकास निधीची वसुली वेळीच वसुल करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.51 अल्पसंख्याक विभागाअंतर्गत ग्रामपंचायतीला सिमेंट रोड व नाली बांधकामाबाबत अनुदान वितरनाबाबत**

**पंचायत समिती सेलू, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 20,00,000/- खर्च करण्यात आला आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये ग्रामपंचायत हिगणी व ग्रामपंचायत सालई कला ला अनुदान वितरीत करण्यात आले आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) अल्पसंख्याक विभाग, शासन निर्णय क्रमांक 2015/प्र.क्र.77/कार्या-9, दिनांक 22/09/2015 नुसार ज्या ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्येपैकी अल्पसंख्याक समुहाची लोकसंख्या 100 किंवा त्यापेक्षा ज्यास्त आहे, अशा अल्पसंख्याक बहुल ग्रामपंचायतींना अनुदेंय पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी शासनाकडून प्रती ग्रामपंचायतीना अनुदान उपलब्ध करून दयायचे असतांना, सन 2016-2017 वित्तींय वर्षाच्या लेखापरीक्षणात नस्त्याची तपासणी केली असता, ग्रामपंचायत सालई कला ने सादर केलेल्या प्रस्तावातील प्रपत्र अ नुसार सालई ग्रामपंचायतीची अल्पसंख्याक लोकांची लोकसंख्या 36 असतांना, सदर ग्रामपंचायतीला अनुदान रूपये 10,00,000/- वितरीत केल्याने शासनाचा उददेश सफल झाला नाही व शासनाचा पैसा निरर्थक खर्च झाला.

2) सदर योजनेअंतर्गत हाती घ्यावयाची कामे कबरस्थान / स्मशानभूमी / अंत्यविधी जागेतील अंतर्गत रस्ता कामे ही तीन फुट रूंद असावी, असा निकश असतांना अंदाजपत्रके हे 3.30 फुट घेवून तयार करण्यात आल्याने अंदाजपत्रकिय रक्कमेत वाढ झाली आहे.

3) उपरोक्त अभिप्राय 1 मधील शासन निर्णय दिनांक 22/09/2015 मधील शासनाचे अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या स्थळी प्रासंगिक भेटी देवून कामाच्या प्रगतीचा व दर्जाची तपासणी करून तसा अहवाल शासनास देतील, असे नमूद असतांना, अशाप्रकारे भेटी कामाच्या ठिकाणी दिल्याबाबतचा अहवाल नस्तीत उपलब्ध नाही.

**4.52 ठक्कर बाप्पा योजनेअंर्तगत ग्रामपंचायतला बांधकामासाठी अनुदान वितरणाबाबत.**

**पंचायत समिती हिंगणघाट, जिल्हा वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदर बाबत अनुदान ग्रामपंचायतीला वितरीत करून रक्कम रूपये 96,24,279/- खर्च रोख पुस्तकात खर्ची घालण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) प्रशासकीय मंजूरी आदेश क्रमांक 2381 दिनांक 03/03/2016 नुसार प्रथम हप्ता 90 टक्के ग्रामपंचायतीला वितरीत करण्यात आला असून उर्वरीत 10 टक्के निधी झालेल्या कामाचे मुल्यांकन घेऊन वितरीत करणे आवश्यक असतांना मुल्यांकन न घेताच अनुदान वितरीत करण्यात आले आहे

2) नियोजन-17/प्र.क्र./का.2(2)/2390/कार्यालय प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, नागपूर दिनांक 29/03/2017 मधील अट क्रमांक ग्रामिण क्षेत्रात ज्या वस्तीत कामे करायची आहे, त्या क्षेत्रातील आदिवासींची लोकसंख्या 50 टक्के असणे आवश्यक असतांना, कागदोपत्री शहानिशा न करता अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच अट क्रमांक 3 नुसार सदर कामे ही, इतर निधीतून करण्यात आली नाहीत, याची शहानिशा न करता अनुदान वितरीत करण्यात आले, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचे पत्र क्रमांक ठक्कर बाप्पा/प्र.क्र./का 2/384, दिनांक 19/01/2017 ग्रामपंचायत आजनसरा येथे वाद उदभवल्याने मंजूर केलेल्या कामाच्या अनषंगाने चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. सदर कामे ही त्याच वित्तीय वर्षात पुर्ण करणे आवश्यक असतांना कामे पुर्ण झाली नाहीत.

**4.53 राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियाण भंडारा यांना रक्कम प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मोहाडी, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 67,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

राजीव गांधी सशक्तीकरण अभियान, भंडारा यांनी दिनांक 11/04/2017 ला त्यांचे देयकानुसार मागणी केल्याचे आढळुन आले. पंचायत समितीच्या देयकावर दिनांक 11/04/2017 ला देयक सादर केल्याचे दिसुन येते. तसेच राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण भंडारा यांना रक्कम कशासाठी प्रदान करण्यात आले? याबाबतचा अभिलेख उपलब्ध नाही. त्यामुळे शासकीय रक्कमेचा योग्य उपयोग झाल्याची खात्री होत नाही. मागणी माहे एप्रिल 2017 मध्ये असतांना दिनांक 31/03/2017 ला देयक पारित कसे करण्यात आले? याबाबत योग्य खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.54 सेवानिवृत्त स्थानांतर प्रवास भत्ता जादा शोधनाबाबत.**

**पंचायत समिती गोरेगाव, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,757/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रंमांक प्रवास -1010/ प्र. क्र. -2/ सेवा -5, दिनांक 03/03/2010 चे नियम 11 (ड)(3) नुसार वरील सर्व कर्मचाऱ्यांचे स्वगाव हे रेल्वेने जोडले नसल्यामुळे एकुण रूपये 11,757/- वसुल पात्र ठरते.

2) श्रीमती ए. जी. ठवरे, श्री. के. झेड. भदाडे, श्री.एम.जी. गणविर, श्री.आर.पी. कातखेडे यांनी सेवापुस्तकाची प्रथम पानाची झेरॉक्स सत्यप्रत सदर देयकाला जोडली नाही. त्यामुळे त्याच्या मुळ गावाबददल खात्री पटत नाही. तसेच सदर कर्मचा-यानी सेवापुस्तकामधील शेवटचे मुळ वेतन व ग्रेड पे ची झेरॉक्स सत्यप्रत सदर देयकाला जोडली नाही. त्यामुळे संयुक्त सेवानिवृत्त स्थानांतर अनुदान अचूक असल्याची खात्री करता आली नाही

**4.55 निवृत्ती वेतन तथा कुटूंब निवृत्ती वेतनाची रक्कम प्रदाना बाबत.**

**पंचायत समिती आमगाव, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रूपये 37,40,171/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सेवा निवृत्ती वेतन धारक यांची निवृत्ती वेतनाची वेतन निश्चिती ही एकस्तर वेतन श्रेणी नुसार न करता त्यांचे मुळ वेतन श्रेणी नुसार करावयाची आहे. मात्र निश्चितीची प्रकरणे ही मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचेकडे सुधारित निश्चितीप्रमाणे सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. वेतन निश्चितीनंतर जादा प्रदान रक्कमेची वसूली त्वरीत करून शासन शिर्षामध्ये जमा करून तसे अनुपालन दर्शविण्यात यावे.

**4.56 शासकीय वाहनाने सभापती/उपसभापती यांनी एकटयाने प्रवास केल्याबाबत**.

**पंचायत समिती चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,35,208/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासकीय वाहनाचा वापर करतांना व कामाची पाहणी करतांना सभापती / उपसभापती यांचे सोबत जबाबदार क्षेत्रीय अधिकारी असावे, असे शासनाचे दिशा निर्देश असतांना सन 2016-2017 मध्ये वाहन क्रमांक MH34-8612 चा वापर फक्त् एकटयाने केलेला असल्याचे लॉगबुक वरून लेखापरीक्षणास दिसुन आले.

2) सभापती / उपसभापती यांनी एकटयाने प्रवास केल्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 11 दिनांक 25/07/2017 अन्वये खुलासा विचारला असता, संवर्ग विकास अधिकारी यांनी सदरचा प्रवास हा शासकीय प्रयोजन व जनकल्याणार्थ होता, असे कळविले. त्यासोबतच्या प्रमाणपत्रामध्ये श्री.डि यु. वाढवे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, कु.पल्लवी ताकसांडे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, एन.आर.भगत, विस्तार अधिकारी पंचायत हे वाहन क्रमांक MH34-8612 मध्ये सन 2016-2017 मध्ये सोबत असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे. तथापि, श्री.वाढवे व कु.तांकसांडे हे स्थापत्य अभीयांत्रिकी सहायक पदावर असल्याने क्षेत्रीय अधिकारी या दर्जामध्ये येतात. याबाबत संबंधितांनी खात्री पटवणे आवश्यक आहे. याप्रमाणे वाहन लॉगबुकामध्ये संबधितांच्या नोंदी व स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना तपशील व दिनांक निहाय नोंदी व स्वाक्षरी नसल्याने सदर बाब नियमबाहय असल्यामुळे उपरोक्त प्रवास खर्च वसूल पात्र ठरतो.

3) संवर्ग विकास अधिकारी यांनी अर्धसमास पत्र क्रमांक 11 सोबत लेखापरीक्षणाला दिलेले प्रमाणपत्रामध्ये श्री.डियु.वाढवे स्थापत्य अभीयांत्रिकी सहायक, कु.पल्लवी ताकसांडे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, एन.आर.भगत, विस्तार अधिकारी पंचायत यांचे दिनांक 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीतील मंजुर दौरा दैनंदिनी तसेच हजेरी पट लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून न दिल्याने याबाबतचा प्रवास खाजगी प्रवास ठरतो. त्यामुळे उपरोक्त प्रवास खर्चाची रक्कम रूपये 3,35,208/- वसूलपात्र ठरते.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन 2014/प्र.क्र.23/14/विनियम, दिनांक 30/05/2014 अन्वये पेट्रोल / डिझेल / सी.एन.जी वर चालणा-या सर्व शासकीय वाहनांचा खाजगी वापरासाठी यापुढे सरसकट रुपये 12/- प्रती किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी. शासकीय वाहनाच्या खाजगी वापरासाठी कमाल मर्यादा प्रती माह 700 किलोमीटर इतकी राहील. तथापि, अपवादात्मक बाबतीत सदर मर्यादा ओलांडल्यास 700 किलोमीटरच्या पुढील अंतरासाठी रुपये 18/- प्रती किलोमीटर या दराने वसुली करण्यात यावी, अशी तरतुद आहे. तेव्हा त्या अनुषंगाने एकुन 18,856 किलोमीटर पैकी पहिल्या 700 X 12 = 8,400/- व त्यानंतरच्या 18,156 X 18 = 3,26,808/- असे एकुण 3,35,208/- एवढी रक्कम संबधितांकडून वसुलीची कार्यवाही करावी.

**4.57 वर्ग 1 ते 4 मुलामुलींकरीता मोफत गणवेश वाटप अनुदानाचे नियमबाहय प्रदानाबाबत**

**पंचायत समिती मूल, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 5,02,758/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2013/(67/13)/ प्राशि-5, दिनांक 31/10/2013 अन्वये राज्य शासनाची वर्ग 1 ते 4 मुलामुलींकरीता गणवेश वाटप योजना बंद करण्यात

आलेली असल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 6 दिनांक 15/09/2017 अन्वये सदर योजना बंद झालेली असतांना वरीलप्रमाणे अनुदान प्रदानाबाबत सुधारीत शासन निर्णय /आदेश इत्यादी सादर करण्यास सांगितले असता, कोणतेही उत्तरे प्राप्त झाली नाहीत. तरी वरील अनुदान प्राप्त आदेशानुसार आदिवासी उपयोजना अंतर्गत रुपये 29,408/- इतके अनुदान प्राप्त झालेले असतांना इयत्ता 1 ते 4 थीचे अनु सचित जमाती प्रवर्गातील एकुण 840 विद्यार्थ्यांकरीता रुपये 200/- प्रमाणे एकुण रूपये 1,68,000/- अनुदान प्रदान केल्याने मुळ प्राप्त अनुदानापेक्षा जादा खर्च केलेला आहे.

2) वरील प्रमाणकान्वये इयत्ता 1 ते 4 थी चे अनुसुचित जात प्रवर्गातील एकुण 530 विद्यार्थी, विमुक्त व भटक्या जमाती प्रवर्गातील एकुण 1,028 विद्यार्थी, विशेष मागासप्रवर्गातील एकुण 52 विद्यार्थींना रुपये 200/- प्रमाणे अनुदानाचे वाटप करण्यात आले. तरी वरील नमुद शासन निर्णयात विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुदान प्रदान करणेबाबत तरतुद नमुद नसतांना तसेच वरील अनुदान प्राप्त आदेशात अनुसुचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता अनुदान प्राप्त असतांना इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुदानाचे वाटप केल्याने तसेच वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुदान वाटप करणेबाबत कोणतेही सुधारीत आदेश, शासन निर्णय इत्यादी सादर न केल्याने केलेला खर्च लेखामान्य करता येत नाही.

3) वरील नमुद आदेशात सदर अनुदान हे सन 2015-2016 या शैक्षणीक वर्षाकरीता असल्याने माहे मार्च 2016 अखेर अनुदान प्राप्त झालेले असुन प्रदान हे सन 2016-2017 या शैक्षणीक वर्षाचे सुरवातीला म्हणजेच माहे जुन 2016 मध्ये प्रदान केल्याचे दिसुन आले. तरी सन 2015-2016 या शैक्षणीक वर्षातील इयत्ता वर्ग 4 थीचे विद्यार्थी सन 2016-2017 मध्ये उत्तीर्ण होऊन इयत्ता 5 वी मध्ये प्रवेश केलेला असेल, तर अशा सर्व प्रवर्गातील एकुण 660/- विद्यार्थ्यांकरीता रुपये 200/- प्रमाणे एकुण रूपये 1,32,000/- नियमबाह्य अनुदानाचे वाटप केल्याने योजनेचा मुळ उद्देश साध्य झालेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1082/645/ 266/34, दिनांक 29/06/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन करणेबाबत निर्देश असतांना संबंधीत शाळेचा उपयोगीता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल नस्तीबध्द नसल्याचे दिसुन आले.

**4.58 ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवालाकडे गंभिर दुर्लक्षीतता.**

**पंचायत समिती वरोरा, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती वरोरा चे सन 2016-2017 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत लेखापरीक्षण स्थानिक निधी विभागाचे लेखापरीक्षकांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षा नियम 1961 मधिल तरतुदीनुसार करुन लेखापरीक्षण अहवाल संबंधित ग्रामपंचायतींना निर्गमित करुन अहवालाची प्रत संबंधित संवर्ग विकास अधिकारी व संबंधित जिल्हा परीषदेला एकाच वेळी निर्गमित केलेली आहे.

जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 140 (3)(क) प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींने ग्रामसेवकाने केलेल्या अपहार / नियमबाहय खर्चाची वसुली अदायगी झालेली नाही. पंचायत समिती स्तरावर लेखापरीक्षण अहवालाचे अभिलेखे गठ्ठयात बांधुन ठेवण्यात आलेले आहेत. परंतु, त्यावर कार्यवाही करण्यासाठी लेखा आक्षेप परिच्छेदावर नियंत्रण ठेवण्यासाठी लेखा आक्षेप निपटारा नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा परीषद अंतर्गत पंचायत समिती निहाय एकुण किती ग्रामपंचायतीची अफरातफरीची रक्कम लेखा आक्षेपाप्रमाणे वर्षनिहाय ग्रामपंचायतीकडे / ग्रामसेवकाकडे प्रलंबित आहेत? याबाबतचा शोध घेणे व त्यानुसार अद्यावत अभिलेखे नोंदवही ठेवणे व वेळोवेळी त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**4.59 रोखभत्ता प्रदानामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) व**

**पंचायत समिती कन्नड, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती औरंगाबाद व कन्नडचे सन 2016-2017 लेखापरीक्षणात पंचायत विभाग (आस्थापना) चे अभिलेखे व वेतन देयके तपासले असता ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना वेतन भत्ते देयकात प्रत्येकी रुपये 75/- रोखभत्ता प्रदान केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहे ऑक्टोबर 2016 व माहे मार्च 2017 या कालावधीचे वेतन देयकाची तपासणी केली असता एकुण 176 ग्रामसेवकांना प्रतिमहा रुपये 75/- रोखभत्ता प्रदान केला आहे. परंतू, राज्य वेतन सुधारणा समिती 2008 च्या अहवालातील परिच्छेद क्रमांक 3.25.2 तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक 209/प्र.क्र.20/सेवा-9, दिनांक 27/02/2009 मधील अनुक्रमांक 29 अन्वये पोलीस शिपाई व पोलीस हवालदार वगळता सर्व संवर्ग पदास मिळणारे विशेष वेतन/रोखभत्ता बंद करण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश असतांना ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांना रोखभत्ता प्रदान केल्यामुळे पंचायत समिती औरंगाबादने रूपये 81,000/- व पंचायत समिती कन्नडने रूपये 77,400/- अतिप्रदान केलेले आहेत.

2) तरी उपरोक्त प्रमाणे जादा प्रदान केलेली रक्कम रुपये 1,58,400/- संबंधित कर्मचा-यांकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

तरी उपरोक्त प्रमाणे रोखभत्त्याची जादा प्रदानाची रक्कम ज्या कालावधीपासून दिलेली आहे, त्या कालावधीपासुन मार्च 2017 पर्यंत प्रदान केलेली आहे. त्याचा सविस्तर तपशिलासह जादा प्रदान रक्कम परिगणित करुन शासन खाती भरणा करावी.

**4.60 जनसुविधा योजनेंतर्गत विकास कामात आढळलेल्या अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद सन 2016-2017 या कालावधीच्या लेखापरीक्षणामध्ये लेखाशिर्ष 2515-जनसुविधा योजनेंतर्गत रक्कम रूपये 99,75,800/- विकासकामे करण्यात आली. संबंधित गावाचे सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत यांना कंत्राट देवून कामे करण्यात आली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक मातसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39, दिनांक 26/11/2014 नुसार रुपये 3. लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या कामाकरता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असतांना काही बाबतीत विनानिविदा अंदाजपत्रकीय दराने ग्रामपंचायतींना कामे देण्यात आली.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार उपअभियंता यांनी बांधकामासंबधी संपूर्ण तपशिल दर्शविणारी नमुना क्रमांक 69 (बांधकाम नोंदवही) अद्यावत करण्यात आली नाही. त्यामुळे दुबार काम घेतले किंवा नाही, हे तपासता आले नाही. नोंदवही अद्यावत करून अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जिपर-2000/प्र.क्र.837/परा 8 (35), दिनांक 15/09/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि, उपरोक्त कामाचा विमा 1 टकके रक्कम रुपये 1,00,010/- संबंधितांकडून वसूल करून विमा संचालनालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

4) अनुक्रमांक 8 व 12 बाबत कामावर वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल संचिकेत आढळून आले नाहीत. शासन निर्णय दिनांक 22/03/2005 नुसार शासकीय संस्थेकडून घेवून अनुपालन दर्शवावे

5) उपरोक्त कामाबाबत ग्रामपंचायतीकडून बी-1 निविदा फॉर्म भरून घेण्यात आला नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिपत्रक क्रमांक सीएटी 09/05/प्र.क्र.381/ईमारती-02, दिनांक 12/11/2007 नुसार प्रती निविदा फॉर्म शुल्क रुपये 500/- प्रमाणे रुपये 7,500/- पंचायत समितीचे नुकसान झाले आहे. तरी संबंधिताकडून बी-1 निविदा फॉर्म शुल्क वसुल करून पंचायत समिती उपकरात भरणा करणे आवश्यक आहे

**4.61 पंचायत समिती उपकरातून 100 टक्के अनूदानावर पोर्टेबल झेरॉक्स मशीन वाटप (3 टक्के अपंग खर्च)**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पोर्टेबल झेरॉक्स मशीन वाटपाकरीता रककम रुपये 2,99,997/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारणा विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1099/प्र.क्र. 78/05, दिनांक 09/01/1997 मधील परि क्रमांक 3 प्रमाणे साहित्य खरेदीपूर्वी लाभार्थी निवड केलेली नाही.

2) मुंबई शॉप ॲक्ट प्रमाणे मुंबई दुकाने व अधिनियम 1949 नमूना 5 प्रमाणे मे. आशिष एजन्सी मंठा यांचे संस्था (दुकाने) नोंदणी प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच उदयोग संचालनालयाचे पुरवठा नोंदणी प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्यामुळे संबंधित पुरवठादार हे पोर्टेबल झेरॉक्स मशीनचे अधिकृत पुरवठादार असल्याबाबत खात्री झाली नाही

3) निविदेतून प्राप्त झालेल्या दराची बाजारभावाशी तुलना केल्याचे दिसून येत नाही

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील अनुक्रमांक 4 नूसार विहीत केलेली नोंदवही लेखापरिक्षणात प्राप्त झाली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील कलम 83(3) प्रमाणे प्राप्त साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र नमूद केलेले नाही

6) भारतीय मानक ब्युरो मान्यताप्राप्त दर्जा असलेले साहित्य प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र अथवा नोंद संचिकेत दिसून आली नाही.

7) लाभार्थी मुद्रीत प्रस्तावामध्ये व सोबत जोडलेले अनुषंगीक कागदपत्रे असलेला संपूर्ण प्रस्ताव संचिकेमध्ये संलग्न केलेला नाही. त्यामुळे कोणत्या लाभार्थींना लाभ दिला, याबाबत निकष कोणते लावणे. निवड प्रक्रिया कशी केली, याबाबत खात्री झाली नाही.

8) उपरोक्त खरेदीबाबत शासन दर करार असलेबाबत चौकशी न करता स्थानिकरीत्या खरेदी केली आहे.

9) साठा नोंदवहीत डिलेवरी चलानप्रमाणे साहित्य प्राप्त झालेबाबत नोंद घेवून साहित्याची वाटप लेखापरिक्षणात दर्शविले नाही.

**4.62 शासकीय निवासस्थान वापराबाबत.**

**पंचायत समिती बसमत, जिल्हा हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समितीकडे एकूण 16 निवासस्थान असून त्यापैकी 02 निवासस्थान रिकामे आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासकीय निवासस्थान अनूज्ञेय कालावधीनंतरही न सोडल्यामूळे अधिक वास्तव्य केल्यामूळे दंडनीय कारवाई होणे आवश्यक आहे. शासन निर्णय लेखापरिक्षण वर्ष पुढील असला तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2013 / प्र.क्र. 96 / मिव्य 2, दिनांक 15/06/2015 नूसार सर्व संबंधितांवर दंडात्मक कारवाई करून दंडनीय दराने अनूज्ञप्ती शूल्क एकूण रक्कम रूपये 70,560/- वसूल करून निवासस्थान रिक्त करून सध्या कार्यरत कर्मचारी यांना देण्यात यावे.

2) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक घभाभ - 2011 / प्र.क्र.24 / सेवा - 05, दिनांक 15/11/2011 नूसार मूंबई नागरी सेवा नियम 1959 मधिल नियम 850 नूसार भाडेमाफ निवासस्थान सवलत लागू केलेली आहे त्या बदल्यात भाडेमाफ निवासस्थान न मिळाल्यास घरभाडे भत्ता देण्याची तरतूद आहे. परंतू, उक्त प्रकरणी सर्व कर्मचारी यांचे मुख्यालय बदललेले आहे आणि त्यांचे सध्याचे मुख्यालयी सदरील कर्मचारी भाडेमाफ निवासस्थान न मिळाल्याचा लाभ घेवून घरभाडे भत्ता उचल करीत आहेत. त्यामूळे सदरील कर्मचारी यांना अती प्रदान होत असून सदरील अती प्रदानाची तात्काळ वसूली करण्यात यावी. याबाबत पंचायत समिती, वसमत यांनी सबंधित बदली झालेल्या आस्थापना विभागास सूचित करून घरभाडे अदा न करणेबाबत सूचना देणे आवश्यक होते.

3) याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1959 नुसार संबंधित कर्मचारी यांचेवर कारवाई होणे आवश्यक आहे.

उपरोक्त ब प्रमाणे गाळे रिकामे असल्यानमूळे घरभाडेची अनूज्ञप्तीण शूल्क जिल्हा परिषदेला मिळत नाही. त्यामूळे जिल्हा परिषदेचे उत्पन्नात घट होत आहे.

4) नादुरूस्त गाळे दूरूस्त करण्यात यावे किंवा मोडकळीस आलेल्या गाळयाचे ठिकाणी नवीन गाळे बांधून जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढीकरीता प्रयत्न करणेत यावेत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास / 1089 / सी आर / 3652 / 26, दिनांक 30/06/1993 व जिल्हा परिषदेच्या निवासस्थानाबाबत नियमावलीनूसार निवासस्थान वाटप केले नाहीत.

6) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाव - 2010 / प्र.क्र. - 4 / सेवा - 5, दिनांक 19/04/2011 नूसार घरभाडे व अनूज्ञाप्ती शूल्क आकारून थकीत भाडे वसूल करण्यात यावे

**4.63 लोकप्रतिनिधी योजने अंतर्गत सौरउर्जा पथदिवे बसविणे कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती किनवटचे सन 2016-2017 या कलावधीचे लेखापरीक्षणात लोकप्रतिनिधि अंतर्गत सौरउर्जा पथदिवे बसविणेकरीता सर्व कामे ग्रामपंचायतीस वाटप केलेले असून एकूण (38) कामावर रक्कम रुपये 1,12,12,867/- खर्च केलेली आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक 2271, दिनांक 29/12/2016 अन्वये सौरउर्जा पथदिवे बसविने कामास एकाच ग्रामपंचायतील कामासाठी रुपये 2.99 लक्ष मर्यादेत तीन-तीन कामाकरीता तुकड़े पाडून प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-1093/प्र.क्र.1516 (भाग-1)/33, दिनांक 27/04/2000 अन्वये कोणत्याही परिस्थितीत कामाचे विभाजन करण्यात येऊ नये. संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी बांधकामाला तांत्रिक मान्यता देते वेळी व तसेच निविदा मागविण्यापुर्वी कामाची विभागणी केलेली नाही, याची तपासणी करावी. कामाची विभागणी शासनाची पूर्व अनुमती न घेता केली असल्याचे आढळल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा असे स्पष्ट केलेले आहे. केवळ ग्रामपंचायतीस कामे देण्यासाठी व ई-निविदा टाळण्यासाठी कामाचे तुकडे पाडून दिलेली मान्यता शासन नियमाचे विसंगत व नियमबाह्य आहे. परिणामी स्पर्धात्मक दराचा फायदा मिळालेला नाही. तसेच कामाची गुणवत्ता कशी राहीली, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ट-2 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/ वित-9, दिनांक 31/01/2013 अन्वये या स्तरावर प्रशासकीय, तांत्रीक व निविदा मंजुरीचे केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आगामी सर्वसाधारण सभेत अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याचे ठराव संचिकेत नाही

3) सोबतच्या तपशिलातील कामाची संचिका, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता स्ट्रीट लाईट खरेदीबाबत पुरवठा आदेश इलेक्ट्रॉनीक सोलार सिस्टिम, कोरेगांव सातारा व सुमंगला इंटरप्राइजेस अँड सोलार सिस्टिम, नांदेड यांना देवून त्यांचेकडून खरेदी केल्याचे पावती देयकासोबत आहे. परंतु, त्यावर स्ट्रीट लाईट दर किती वॅटचे आहे, याबाबतचे विवरण नाही. त्यामुळे खरेदी प्रक्रिया कशी केली, याबाबत अभिलेखे अभावी खातरजमा करता आली नाही. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाचे CSR नुसार 37 वॅट स्ट्रीट लाईटचे दर रुपये 23,133.60 प्रती नग दर्शवुन त्यानुसार देयक प्रदान केलेली आहे याबाबत CSR नुसार 37 वॅट स्ट्रीट लाईटचे पुरवठा करुन बसवील्याचे तांत्रिक व क्षेत्रीय तपासणी करुन अनुपालन सादर करावे.

4) सौरउर्जा पथदिवे बसविणे अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिल्हा प्राधिकरण, नांदेड यांची मान्यता घेतलेली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत कामासाठी जिल्हा परिषद / पंचायत समितीचे स्वतंत्र यंत्रणा असतांना तांत्रिक मंजूरी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिल्हा प्राधिकरण, नांदेड यांची मान्यता घेवुन काम करण्याचे प्रयोजन काय, याबाबत खुलासा करावा व कामाचे मूल्यांकन विद्युत अभियंताकडून करणे आवश्यक असतांना स्थापत्य अभियंता यांनी केलेले कामाचे मुल्यांकन तांत्रिकदृष्टया योग्य असल्याची सत्यता पटत नाही. सदर

प्रकरणात सर्व कामाची तांत्रिक व क्षेत्रीय तपासणी करुन केलेले मूल्यांकन व कामाची गुणवत्ता योग्य असल्याची खात्री पटवावी व अनुपालन दर्शवावे.

5) उपरोक्त कामाची संचिकेची तपासणी केली असता मंजूर Location प्लान नाही. कामाचे सुरुवातीचे व कामपूर्ण झाल्यानंतरचे फोटो संचिकेत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष काम झाले किंवा कसे, याची खातरजमा करता आली नाही.

6) तांत्रिक मान्यता आदेशातील अटी व शर्तीनुसार विद्युत महामंडळ यांचेकडून विद्युत निरीक्षक परवानगी, नकाशा मंजुरी व कामाची गुणवत्ता याबाबतचे अभिलेखे संचिकेत नाही. पुर्तता करावी.

7) अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे बांधकाम खात्याच्या व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या स्पेसिफिकेशन्स व प्रचलित भारतीय नियमावली नुसार (IE-RULS) प्रमाणे करण्यात यावी. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**4.64 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रदानातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती बिलोली, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती बिलोलीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन संचिका व प्रमाणकाची तपासणी केली असता सदरबाबत रक्कम रुपये 10,52,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2012/प्र क्र 235/प रा-3, दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाकडून किमान वेतन अनुदान मिळण्यासाठी व 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिस्स्यास पात्र होण्यासाठी संबंधीत ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे कराची फेरआकारणी व गत वर्षात सर्व कराच्या एकुण मागणीची 90 टक्के वसुली बंधनकारक राहील व सन 2016-2017 साठी गत वर्षाची म्हणजेच सन 2015-2016 ची एकुण वसुली 80 टक्के करणे बंधनकारक राहील, असे स्पष्ट केलेले असतानाही पंचायत समिती, बिलोली अंतर्गत सर्वच ग्रामपंचायतीचे कराची फेरआकारणी व 80 टक्के वसुली नसताना एकुण (73) ग्रामपंचायतीना सरसकट 100 टक्के शासन अनुदान प्रदान केले आहे. याबाबत 0 ते 5,000 पर्यंत लोकसंख्या असलेल्या व रूपये 0 ते 2,00,000/- पर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतीची अनुदानास पात्र असल्याबाबतचे सन 2015-2016 ची एकुण वसुली 80 टक्के झाल्याचे अभिलेखे दर्शवून खात्री पटवावी.

2) उपरोक्त प्रमाणकाची तपासणी केली असता सुधारित आकृतिबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतनाची रक्कम त्यांच्या बँक खातेवर जमा करणे आवश्यक असताना असे न करता ग्रामपंचायतीचे खात्यावर रक्कम जमा केलेली आहे. सदरबाब नियमबाह्य आहे.

पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची माहिती ग्रामपंचायतनिहाय हस्तगत करून ठेवलेली नोंदवही तसेच नमुना नंबर 22 व 24 वरून दरमहा वेतन अदाई केल्याचे विस्तार अधिकारी (पं) यांनी खात्री केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

**4.65 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन अदाईतील अनियमितता व नियमबाह्य अतिप्रदान रक्कम रुपये 24,18,075/- वसूल करून शासन खाती भरणा करणेबाबत.**

**पंचायत समिती माहुर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, माहूरचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेत्तनावर 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 48,36,150/- खर्च नोंदविलेले आहे. सदर खर्चाचे अनुषंगिक संचिका व उपलब्ध अभिलेख्याची तपासणी केली असता त्यामध्ये गंभीर अनियमितता व अतिप्रदान केल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2012/प्र.क्र.235/प.रा-3, दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाकडून किमान वेतन अनुदान करीता 100 टक्के व 75 टक्के वाढीव हिस्स्यास पात्र होण्यासाठी संबंधीत ग्रामपंचायतीनी नियमाप्रमाणे दर चार वर्षांनी नियमितपणे कराची फेरआकारणी करणे व गतवर्षात सर्वकराच्या एकुण मागणीची 90 टक्के वसुली बंधनकारक राहील व सन 2016-

2017 साठी गत वर्षाची म्हणजेच सन 2015-2016 ची एकुण वसुली 90 टक्के करणे बंधनकारक राहील, असे स्पष्ट केलेले आहे. परंतु, पंचायत समिती, माहूर अंतर्गत सर्वच ग्रामपंचायतीचे कराची फेरआकारणी व 90 टक्के वसुली नसताना एकुण (63) ग्रामपंचायत मधील (102) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना देय रकमेच्या 50 टक्के शासन अनुदान अदाई करणे आवश्यक असतांना जाणीवपूर्वक व हेतुपूरस्कर सरसकट 100 टक्के प्रमाणे शासन अनुदान प्रदान करून शासन निधीचे नुकसान केलेले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 24,18,075/- अतिप्रदान झालेले आहे.

2) उपरोक्त प्रमाणकाची तपासणी केली असता सुधारीत आकृतिबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतनाची रक्कम त्यांच्या बँक खातेवर जमा करणे आवश्यक आहे. परंतु, ग्रामपंचायतीचे खाते रक्कम जमा केलेली आहे. सदर बाब गंभीर आहे. शासन नियमाचे पालन न करता ग्रामपंचायत खाते जमा करण्याचे प्रयोजन काय, याबाबत विस्तार अधिकारी (पंचायत) व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माहूर यांचा खुलासा घेणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची माहिती ग्रामपंचायतनिहाय हस्तगत करून ठेवलेली नोंदवही तसेच नमुना नंबर 22 व 24 वरून दरमहा वेतन अदाई केल्याचे विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी तपासणी केल्याचे अहवाल संचिकेत नाही. तपासणी अहवाल दर्शवून अनुपालन सादर करावा.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे परिशिष्ट-चार नियम 20, 21 व 22 अन्वये रक्कम प्रदान करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या बिलाच्या तपशीलवार तपासणी करुन मागणी अनुज्ञेय असल्याचे बरोबर आढळून येईल म्हणजेच आकारणीची रक्कम योग्य मंजूरीवर आधारलेली असेल, तर विभागाने देयक लेखा शाखेत सादर करणे आवश्यक होते. परंतू, मागणी देयकात त्रुटी असतानाही देयक लेखा शाखेत सादर केलेले आहे. सदर बाब गंभीर आहे.

### 4.66 ग्रामपंचायतीस देय अनुदानातून परस्पर रक्कम कपात करुन झालेल्या अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, यांनी वर्ष 2016-2017 मधिल लेखापरीक्षण निवड महिन्यात ग्रामपंचायतीस देय अनुदानातून रक्कम रूपये 405376/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुद्रांक शुल्क व जमिन महसूल अनुदानातून ग्राम पंचायतीकडील येणे बाकी पंचायत समितीने परस्पर कपात करुन घेण्यात आलेली आहे. ग्राम पंचायतींकडुन रोख स्वरुपात रक्कमेची वसुली करणे आवश्यक असतांना अनुदानातुन रक्कम परस्पर कपात करुन घेतल्यामुळे ग्राम पंचायतच्या लेख्यात याबाबत कोणत्याच प्रकारची नोंद न घेतल्यामुळे ग्राम पंचायतींनी पंचायत समितीस सादर केलेले वार्षीक लेखे चुकीचे आहेत.

2) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 124 प्रमाणे ग्रामपंचायतीच्या निव्वळ उत्पन्नात वाढ होऊन उक्त अधिनियमाचे कलम 133 नुसार स्थापन केलेल्या जिल्हा ग्रामविकास निधीत वाढ होऊन जिल्हा परिषदेचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक असतांना परस्पर अनुदानातून रक्कमा कपात केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) अनुदांनामधून ज्यांना रक्कमा अदा केलेल्या आहेत त्यांना कोणत्यांही कालावधिचे दुबार व अयोग्य प्रदान झाले नसलेबाबतची खात्री पटवावी.

4) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 चे कलम 36 (फ) नुसार ग्राम पंचायतीस प्राप्त झालेल्या रक्कमेस नमुना क्रमांक 7 च्या पावत्या देणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने याप्रकारच्या पावत्या घेतेलेल्या नाहीत. सबब ग्रामपंचायतीकडून याप्रमाणे पावत्या घेऊन अनुपालन सादर करावे.